बिसेन डेन्टल केअर
डॉ.दिप(पंकज) बिसेन डॉ.खुशबू बिसेन(पटले)
दंत व मुख रोगविशेषज्ञ
बी.डी.एस.(नागपूर)
ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया
सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे





गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१२ गोंदिया | अंक ४८ | बुधवार,दि.८ नोव्हेंबर २०२३ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/107/2022-2024


## सावधान! दिवाळीच्या पार्श्वभूमीवर बनावट मिठाईचा धोका!

**गोंदिया–** देशात सणासुदीची लगबग सुरु आहे.दिवाळी काही दिवसांवर येऊन ठेपली आहे.दरवर्षी सणासुदीच्या काळात मिठाईचा खप अनेक पटींनी वाढतो.सणासुदीत मिठाईचा खप वाढल्याने खाद्यपदार्थांमध्ये भेसळीचा धोकाही लक्षणीय वाढतो. या पार्श्वभूमीवर येत्या हंगामात मिठाईची वाढती मागणी लक्षात घेऊन भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणने काही मार्गदर्शक तत्त्वे जारी केली आहेत.दुकानदारांना या सणासुदीच्या काळात दुकानदारांना खाद्यपदार्थांच्या गुणवत्तेकडे विशेष लक्ष देण्याच्या सूचना दिल्या आहेत.देशभरात ४००० राज्यस्तरीय अधिकाऱ्यांना दुकानदारांवर निगरानी ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

मात्र गोंदिया जिल्ह्यात वेगळीच परिस्थिती असून मिठाईच्या एकाही दुकानात प्राधिकरणाच्या निर्देशाचे पालन केले जात असल्याचे चित्र नाही.उलट एकेकाळी एका दुकानाने सुरवात करणारे मिठाईवाल्यानी आज शहराच्या प्रत्येक चौकात दुकाने सुरु केल्याने खरंच यांच्या दुकानातील मिठाई मानकानुसार योग्य आहे काय अशा प्रश्न उपस्थित झालेला आहे.

या मिठाई दुकानावर गोंदियाच्या अन्न औषध विभागाच्या अधिकाऱ्यांनी कधी कारवाई करुन नागरिकांना बनावट मिठाई खाण्यापासून परावृत्त केल्याचेही चित्र नाही.उलट दिवाळी आली की एकदोन कारवाईचा फार्स करुन आम्ही कारवाई करीत असल्याचा देखावा करुन दिवाळीची मिठाई आपल्या खिशात भरूनच जात असल्याची चर्चा आहे.दिवाळीच्या काळात परराज्यातून आलेल्या मिठाईवाल्यांच्या दुकानातून लाख रुपयाचे मिठाई पॅकेट दरवर्षी कारवाई न करण्याकरीता घेतले जात असल्याची चर्चा आहे.





आरोग्य तज्ज्ञांच्या मते, दिवाळी किंवा सणासुदीच्या काळात बाजारात विकल्या जाणाऱ्या मिठाईत मोठ्या प्रमाणात भेसळ होत असल्याचं दिसून येते.भेसळ करताना खाद्यपदार्थांमध्ये जास्त प्रमाणात स्टार्च मिसळला जातो.स्टार्चचे जास्त प्रमाण मूत्रपिंड आणि यकृतासाठी अत्यंत हानिकारक आहे.कधी–कधी मिठाईमध्ये फॉर्मेलिनचाही वापर केला जातो. फॉर्मेलिन वापर सामान्यतः मृतदेह दीर्घकाळ टिकवण्यासाठी केला जातो.मिठाईमध्ये फॉर्मेलिन सारखे केमिकल वापरणे अत्यंत हानिकारक असून ते घातक आहे. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि गर्भवती महिलांसाठी हे अत्यंत हानिकारक आहे..या साहित्याची वापर करुन मिठाई विकणाऱ्या दुकानदारांनी काही राजकीय पाठबळ असलेल्या लोकांना हाताशी धरुन आपला हा काळा धंदा चालवून नागरिकांचे आरोग्य बिघडवण्याचे काम सुरु केले आहे.

मिठाईमध्ये प्रामुख्याने माव्याचा वापर केला जातो. दुधापासून बनविलेला मावा नाशिवंत असल्यामुळे लवकर खराब होतो.असा खराब मावा मिठाई बनविताना वापरला,तर आरोग्यावर दुष्परिणाम होतो आणि मावा घालून बनवलेली मिठाई फार काळ विक्रीस ठेवली तरीही नाशिवंत माव्यामुळे ती मिठाई खराबच होते.

ग्राहकांच्या आरोग्याच्या सुरक्षिततेची काळजी होणारा असा नवा कायदा अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने २५ सप्टेंबर २०२० रोजी जारी केला; ज्याद्वारे मिठाईच्या दुकानात पेप–Packed/loose असलेल्या कंटेनरमध्ये आणि ट्रेमध्ये ठेवलेल्या मिठायांवर `Best Before date' टाकणे/घालणे बंधनकारक केले.मात्र गोंदियातील कुठल्याही मिठाईच्या दुकानातील मिठाईच्या पॅकेटवर असे लिहिलेले मिळायलाच मिळत नाही.

नव्या कायद्यानुसार उत्पादकांना अन्नपदार्थांवर कालमर्यादेचा उल्लेख करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मिठाईमध्ये असलेल्या खव्यामुळे (खराब) अन्नातून विषबाधा होऊ शकते, ही बाब ध्यानात घेऊन या कायद्याची कडक अंमलबजावणी होणे आवश्यक असतांना गोंदियात यास तिलांजली दिली जात आहे.

या मिठाईच्या बाबतीत एक खबरदारी म्हणजे त्यावर लावण्यात येणारा हा वर्ख चांदीचा असल्याचा दावा करण्यात येतो.चांदीचा सध्या असलेला भाव पाहता सर्रास चांदी वापरली जाते का? हा प्रश्न मनात नक्की उपस्थित होतो. चांदी ऐवजी अल्युमिनियम या धातूचा पातळ पत्रा जो चांदीच्या वर्खाप्रमाणे पातळ बनतो तो वापरला जातो. चरबीच्या दोन थरांमध्ये चांदी ऐवजी ॲल्युमिनियमचा पत्रा ठेवून त्यावर धोपटले जाते व अति पातळ पत्रा बनविण्यात येतो. हीसुद्धा भेसळच आहे. ॲल्युमिनियमचे बारीक कण आतड्यांना चिकटून राहतात. त्याचे विघटन होत नाही आणि सातत्याने ॲल्युमिनियम पोटात गेल्यास अल्सर आणि नंतर कॅन्सरसारखे दुर्धर आजार उद्भवतात. चांदीच्या वर्ख ओळखण्यासाठी जर चिमटीमध्ये वर्ख धरला आणि कुस्करला तर त्याची पावडर होते, तर अल्युमिनियमचा पातळ पत्रा चिमटीमध्ये धरला आणि कुस्करला तर त्याची टणक गोळी बनते.

मिठाईवर खूप वेळा केशराचे मोठे तंतू लावलेले दिसतात. मक्याच्या कणसाचे तंतू मेटॅनिल यलो या अखाद्य रंगामध्ये बुडवून ते वाळवून वापरले जातात. मेटॅनिल यलोसारख्या अखाद्य रंगामुळे शरीरास अपाय होतो, अपंगत्व येते. याबरोबरच वनस्पती तेल, मिल्क पावडर आणि साखरेचे मिश्रण यापासून बनवला गेलेला, पूर्णपणे नकली मावा बाजारात स्वस्तात उपलब्ध होतो.

अशा संभाव्य धोक्यांमुळे जागरूकपणे येत्या दिवाळीत नागरिकांनी खरेदी करतांना काळजी घेणे आवश्यक असून सोबतच दुकानदाराकडे बिल मागण्यास मात्र विसरु नये जेणेकरुन कुणालाही या मिठाईपासून विषबाधा झाल्यास दुकानदारावर कारवाई करण्यास मदत होईल.

## शासनाचे अनुदान रखडल्याने “त्याने” घरकूलच काढले विकायला

**गोंदिया :** पंतप्रधान आवास योजनेंतर्गत २०१८–१९ या वर्षात २ लाख ५० हजार रुपयांचे घरकूल मंजूर झाले. घरकूल बांधून तयार झाले. मात्र अद्यापही त्या घरकुलाचे हप्ते मिळाले नाही. त्यामुळे अखेर कंटाळून त्याने तो घरकूलच विकायला काढले. त्याची परवानगी देवरी नगर पंचायतीकडे मागितली. त्यामुळे नगराध्यक्ष आणि मुख्याधिकारी यांच्यासमोर पेच निर्माण झाला असून ते त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न करत आहेत.

गोंदिया जिल्ह्यातील देवरी शहरातील प्रभाग क्रमांक ९ मध्ये राहणारे चंद्रहास केशोराव लांडेकर यांना २०१८–१९ मध्ये घरकूल मंजूर झाले. त्यांनी घरकुलाचे बांधकाम केले. मात्र अद्यापही त्यांना शेवटचा हप्ता मिळाला नाही.

ज्यांच्याकडून उसनवारी केली, ते आता पैशांसाठी तगादा लावत आहेत. २८८ पैकी १७८ लाभार्थ्यांची देखील हिच स्थिती आहे. वारंवार लाभार्थी नगर पंचायतीत जाऊन शेवटच्या हप्त्याची मागणी करत आहेत. मात्र शासनाकडून पैसे आले नसल्याचे सांगत त्यांना परत पाठविण्याचे काम देवरी नगर पंचायत करत आहे. या प्रकाराला कंटाळून अखेर चंद्रहास केशोराव लांडेकर यांनी आता कर्जाची परतफेड करण्याकरिता आपले घरकूल विकायला काढले असून त्याची परवानी नगर पंचायतीकडे मागीतली आहे. यामुळे नगर पंचायतीपुढे आगळा वेगळा पेच निर्माण झाला आहे.

नगर पंचायतीचे अध्यक्ष आणि मुख्याधिकारी घरकुल लाभार्थी चंद्रहास लांडेकर यांची समजूत काढत आहेत. मात्र चंद्रहास आपल्या मागणीवर ठाम असल्यामुळे आता काय करावे, असा प्रश्न नगर पंचायतीपुढे उभा झाला आहे.



**देवरी शहरात प्रधानमंत्री आवास योजनेच्या शेवटच्या ३० हजार रुपयांच्या हप्त्याला घेऊन लांभर्थ्यात गैरसमज होत आहे. प्रधानमंत्री आवास योजनेच्या लाभार्थांनी आपले शेवटचे कार्य पूर्ण न केल्यामुळे ९० टक्के लोकांचे काम पूर्ण झाले हे सिद्ध होत नसल्याने शासनाने शासनाने निधी पाठविला नाही. संपूर्ण बांधकाम पूर्ण झाल्यावर निधी येणार असून तो लाभार्थ्यांना देण्यात येईल**

**–प्रणय तांबे, मुख्याधिकारी, न. प. देवरी**

## ८ ते २२ नोव्हेंबर पर्यत जिल्ह्यात मनाई आदेश लागू

**गोंदिया :** पोलीस अधीक्षक गोंदिया कार्यालयाचे २ नोव्हेंबर २०२३ चे पत्रानुसार जिल्ह्यात विविध पक्ष व संघटनांकडून त्यांच्या प्रलंबीत मागण्या संदर्भाने उपोषणे, धरणे, मोर्चे, रास्तो रोको, जेल भरो व संप इत्यादी आंदोलने आयोजित केली जात आहेत. तसेच दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्यामुळे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्याच्या दृष्टीने अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी, गोंदिया यांना प्राप्त अधिकाराअंतर्गत सन १९५१ च्या मुंबई पोलीस अधिनियम क्रमांक २२ चे कलम ३७ (१) (३) अन्वये दिनांक ८ नोव्हेंबर पासून ते २२ नोव्हेंबर २०२३ पर्यत अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी स्मिता बेलपत्रे यांनी जिल्ह्यात मनाई आदेश लागू केले आहे. सदर अधिसूचनेतील कोणत्याही शतीचे उल्लंघन झाल्यास संबंधितांवर फौजदारी नियमाअंतर्गत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

## बेरोजगारीच्या मुद्यावर कॉंग्रेसचा एसडीओ कार्यालयावर जनआक्रोश मोर्चा



**गोंदिया:** केंद्रातील भाजप व राज्यातील खोक्यांचे सरकारचे गलथान कारभार व चुकीच्या धोरणांमुळे वाढती महागाई, बेरोजगारी, महिलांवरील अत्याचार, शेतकरी विरोधी धोरणे, सामाजिक द्वेष व जातील दंगली इत्यादीमुळे देशातील जनता हैरान असून जनतेत खदखदत असलेला आक्रोश व्यक्त करण्यासाठी गोंदिया जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्यावतीने इंदिरा गांधी स्टेडीयम येथून जनआक्रोश मोर्चा काढण्यात आला.

हा जनआक्रोश मोर्चा उपविभागीय अधिकारी कार्यालयावर धडकला.या मोर्च्यात विधान परिषद सदस्य ॲड. अभिजीत वंजारी, आमदार सहषराम कोरोटे,महाराष्ट्र प्रदेश सचिव अमर वऱ्हाडे, सचिव पी.जी.कटरे,जिल्हा कॉंग्रेस अध्यक्ष दिलीप बनसोड,राजू पालीवाल यांच्या उपस्थितीत काढण्यात आला.

मोर्च्याच्या प्रमुख मागण्यांमध्ये राज्यात सरसकट दुष्काळ जाहीर करावा, सर्व प्रकारच्या पिकविम्याची रक्कम तात्काळ शेतकऱ्यांना मिळावी, धान पिकांचे आधारभूत हमीभाव खरेदी–विक्री केंद्र त्वरित सुरुवात करणे व धानाला बोनस १०००/– रु. देणे, धान खरेदी किंमत ३ हजार रुपये प्रति क्विंटल वाढविणे, अमली पदार्थ्याच्या तस्करी करणाऱ्यावर कठोर कार्याही करुन अमली पदार्थाचा नायनाट करावा, घरगुती वापरातील गॅस, डिझल, पेट्रोलच्या वाढलेल्या किंमती कमी कराव्यात,नैराश्यात अडलेल्या सुशिक्षीत बेरोजगार तरुणांसाठी नोकर भर्ती त्वरित सुरुवात करणे, महाराष्ट्र राज्यात जातीनिहाय जनगणना करुन व सर्व प्रकारच्या मागासवर्गीयांना आरक्षण लागू करावे,नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यंना प्रोत्साहन राशी म्हणून शासनाने घोषित केलेली होती ती राशी त्वरित देणे, घरगुती विद्युत बिले तसेच शेती पंपावरी बिले यावर युनिट रेट वाढविलेली किंमत कमी करणे, शेतकऱ्यांना शेतीकरिता २४ तास विद्युत पुरवठा करणे, सडक अर्जुनी तालुक्यात नैसर्गिक गारपीटीने शेतकरी व घरांचे झालेल्या नुकसान धारकांना आर्थिक मदत करणे, अतिक्रमण धारकाचे शेतीचे व घरगुती जमीन पट्टे देणे, हत्तीच्यामुळे नागनडोह उध्वस्त गावांचे पूर्णवसन करणे, कंत्राटी नोकर भर्ती बंद करणे व जि.आर.रद्द करणे, शासकीय शाळांचे खाजगीकरण करणे बंद करावे, दुकाने नैसर्गिकरित्या किंवा सार्टर्किटमुळे जळल्यास शासनाकडून आर्थिक मदत करणे, शेतकऱ्यांचे धानाचे पुंजणे जळणे किंवा जनावरांचे गोठे जळाल्यास आर्थिक मदत देणे, जंगली जनावरांमुळे धानाच्या पिकासह अन्य पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यंना पिक विमा लागू करावा, यशवंतराव चव्हाण व ओबीसी घरकुल योजनेचे लाभार्थ्यांना तात्काळ लाभ देणे आदी मागण्यांचा समावेश होता.मोर्च्यात अशोक गुप्ता,संजय बहेकार, जि.प.सदस्य जितेंद्र कटरे,माजी सभापती रमेश अंबुले, रोशन बडोले, योगेश अग्रवाल, डेमेंद्र रहांगडाले,जि.प.सदस्य शशी भगत,विमल कटरे,राधेलाल पटले, गौरव बिसने,राजू काळे,वंदना काळे,राजकुमार पटले ,ओम पटले,आदी कॉंग्रेस नेते सहभागी झाले होते.

## माझे कुटुंब,माझी पेंशन! ८ नोव्हेंबरला निघणार महामोर्चा



**गोंदिया:** एकच मिशन, जुनी पेंशन असा नारा देत जुन्या पेंशनसाठी मैदानात उतरलेले राज्य सरकारी कर्मचारी पुन्हा एकदा आंदोलनाच्या पवित्र्यात असून उद्या ८ नोव्हेंबरला माझे कुटुंब,माझी पेंशन अंतर्गत जिल्हा व तालुकास्तरावर भव्य महामोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. आहे.याबाबत राज्य सरकारी कर्मचारी मध्यवर्ती संघटनेचे सहसचिव आशिष रामटेके यांनी जिल्ह्यातील सर्व कर्मचाऱ्यांना मोर्चात सामिल होण्याचे आवाहन केले.

राज्य सरकारी कर्मचारी संघटना सातत्याने जुनी पेंशन योजना मिळावी यासाठी आंदोलन करीत आहेत. यापुर्वी बेमुदत संप करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी आश्वासन दिले होते की जुनी पेंशन लागू करण्यासाठी सरकार सकारात्मकपणे कार्यवाही करेल मात्र अद्यापपर्यंत ते लागू करण्यात आले नाही. तीन महिन्याची मुदत त्यांनी दिली होती. मात्र अजूनही निर्णय झालेला नाही. तीन महिन्याऐवजी सहा महिने झाले आता तरी सरकारने जुनी पेंशन लागू करावी यासाठी एक इशारा मोर्चा काढण्यात येणार आहे.६ नोव्हेंबरला शासनासोबत समन्वय समितीच्या बैठकीतही ठोस निर्णय न झाल्याने ८ नोव्हेंबरला सर्व राज्य सरकारी कर्मचारी महामोर्चा काढण्यावर ठाम आहेत. या नंतरही जर सरकारने निर्णय घेतला नाही तर १४ डिसेंबरपासून पुन्हा सरकारी कर्मचारी बेमुदत संपावर जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. महामोर्चा सर्व विभागातील सरकारी कर्मचाऱ्यांनी सहभागी व्हावे यासाठी राज्य सरकारी कर्मचारी संघटनेच्यावतीने कर्मचाऱ्यांमध्ये जागृती करीत आवाहन केले जात आहे.

## भितीने नव्हे, तर गतीमान विकासाकरिता गेलो–तटकरे

**गोंदिया:–** आम्ही घेतलेल्या निर्णयावर प्रश्नचिन्ह निर्माण केले गेले. मात्र, आज आलेल्या ग्राम पंचायत निवडणूक निकालावरून अजित पवार यांनी घेतलेल्या निर्णयाला जनतेनेच योग्य ठरवले आहे, अशा शब्दात राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी विरोधकांवर टीका केली. तसेच, भाजपबरोबर गेलो म्हणजे आम्ही जातीयवादी झालो असा आरोप करण्यात येतो. मात्र, ज्यावेळी भाजपला पाठिंबा दिला त्यावेळी आम्ही जातीयवादी नव्हतो का? रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली आमदारांनी भाजपसोबत जाण्यासाठी साहेबांची भेट घेतली होती मग ते काय होते? असा सवालही तटकरे यांनी उपस्थित करीत घड्याळ मात्र तेच कायम असून फक्त वेळ नवी असल्याचे गोंदियातील राष्ट्रवादीच्या मेळाव्यात ते म्हणाले.



दरम्यान, राज्यात ग्रामपंचायत निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसला घवघवीत यश मिळाल्याबद्दल गोंदियाच्यावतीने प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांचा सन्मान करण्यात आला. राज्यातील ग्राम पंचायत निवडणुकीत महायुतीला चांगलं यश मिळालं असून भाजपा, शिंदे गट आणि त्यानंतर राष्ट्रवादी कॉंग्रेसने अनुक्रमे एक, दोन आणि तिसऱ्या क्रमांकाने आघाडी घेतल्याचं दिसून येत आहे. त्यामुळे, महायुती सरकारमधील नेतेमंडळीला आनंद झाला असून राष्ट्रवादी अजित पवार गटाचे प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी प्रतिक्रिया देताना, अजित पवारांचा निर्णय योग्य असल्याचे जनतेने दाखवून दिल्याचं म्हटलं.

राज्यातील २३५९ ग्रामपंचायतींसाठी झालेल्या निवडणुकीची मतमोजणी सुरू आहे. यापैकी जवळपास निम्म्या ग्रामपंचायतींचे निकाल हाती आले आहेत. त्यामध्ये भाजपा, राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गट आणि शिवसेना शिंदे गट यांची जोरदार मुसंडी मारल्याचे दिसत आहे. तर कॉंग्रेससोबतच शरद पवार गट आणि ठाकरे गटाची मोठी पिछेहाट झाली आहे. आतापर्यंत १३२२ ग्रामपंचायतींचे निकाल जाहीर झाले आहेत. त्यामध्ये महायुतीने तब्बल ७८८ जागांवर बाजी मारली आहे. तर महाविकास आघाडीला २९२ ग्रामपंचायतींमध्ये विजय मिळाला आहे. तर इतरांना १६२ ठिकाणी विजय मिळाला आहे.

यावेळी बोलतांना खासदार तथा प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे म्हणाले की, अजितदादा पवार व राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष खा.प्रफुल पटेल यांच्या अध्यक्षतेखाली एनडीएमध्ये सहभागी होण्याचा निर्णय घेतला पण महाराष्ट्राची पुरोगामी विचारधारा शिव, शाहू, फुले, आंबेडकरांची विचारधारा व धर्मनिरपेक्ष विचारांशी तडजोड केले नसल्याचे म्हणाले. सत्तेसाठी व केंद्रीय यंत्रणेच्या बचावासाठी सत्तेत सहभागी झाल्याचा आभास विरोधकांकडून निर्माण केला जातो. पण विकासासाठी व सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी आम्ही सत्तेत आलो आहोत. ते पुढे म्हणाले भिन्न विचारसरणींचे पक्ष सरकार गठित करण्यासाठी एकत्रित येतात, २०१९ मध्य शिवसेना भिन्न विचारधारा असून सोबत आले असे सांगत देशात विचारधारा वेगळी असून सरकार स्थापन झाले आहेत याचा सविस्तर आढावा प्रदेशाध्यक्षांनी उपस्थितां समोर मांडला. त्यामुळे आम्ही जी भूमिका घेतली ती काही वेगळी नाही. राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष अजितदादा पवार व प्रफुल पटेल यांच्या नेतृत्वाखाली जो आपण निर्णय घेतला तो कोणत्याही यंत्रणेच्या भीतीपोटी घेतलेला नसून लोकशाहीच्या सिद्धांतावर विश्वास ठेवून तसेच सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी व राज्याच्या विकासासाठी हा निर्णय घेतलेला आहे ही भूमिका आपण जनसामान्यांपर्यंत पोहचवायला हवी असे आवाहन प्रदेशाध्यक्षांनी केले.

यावेळी सर्वश्री प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे, पालकमंत्री धर्मरावबाबा आत्राम, राष्ट्रीय सचिव राष्ट्रवादीकाग्रेसं राजेन्द्र जैन, आमदार मनोहर चंद्रीकापुरे, युवक कॉंग्रेस अध्यक्ष सुरज चव्हान, राष्ट्रवादी कॉंग्रेस महिला प्रदेश अध्यक्ष रुपाली चाकणकर, प्रशांत कदम, सुनिल मगरे, कल्याण आखाडे, ईश्वर बाळबुध्दे, जिल्हा अध्यक्ष गंगाधर परशुरामकर, निखिल ठाकरे, नरेश माहेश्वरी, केतन तुरकर, राजलक्ष्मी तुरकर, जिल्हा परिषद उपाध्यक्ष यशवंत गणवीर, जि.प.सभापती पुजा अखिलेश सेठ, सुरेश हर्षे, पंचायत समिती उपसभापती निरज उपवशी, गणेश बरडे, प्रभाकर दोनोडे, रफीक खान, मोहन पटले, रमेश ताराम, अजय गौर, योगेन्द्र भगत, डॉ. अविनाश जायस्वाल, माधुरी पालीवाल, लक्ष्मीताई सावरकर, विशाल शेंडे, प्रेम रहांगडाले, बालकृष्ण पटले, कुंदन कटारे, केवल बघेले, डॉ. अजय उमाटे, सुरेश हर्षे, सी के बिसेन, अशोक सहारे, कृष्णकुमार बिसेन, ममता बैस, जया धावडे, सतीश देशमुश, सुनिल भालेराव, विनीत सहारे, सचिन शेंडे, नानु मुदलीयर, राजेश भक्तवती, कमलबापु बहेकार, माधुरी नासरे, प्रियाताई हरिणखेडे, दुर्गा तिराले, कुंदा दोनोडे, आशा पाटील, सुनील पटले, शैलेश वासनिक व शेकडोच्या संख्येने कार्यकर्ता व पदाधिकारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन रवि मुंदडा व आभार कुंदन कटारे यांनी केले.

## जखणगावमध्ये जातगणना सुरू; महाराष्ट्रातील पहिले गाव जातनिहाय जनगणना करणार

**अहमदनगर:–** बिहार राज्यामध्ये झालेली जातगणना व तिच्या अहवालावरुन उठलेले वादंग पाहता नगर जिल्ह्यातील एका गावानेही असे धाडस दाखवले आहे. नगर तालुक्यातील जखणगावने ग्रामपचायत कार्यालयात ग्रामसंसदेच्या ३० ऑक्टोबरला झालेल्या मासिक बैठकीत हा निर्णय घेतला व आज बुधवारपासून (१ नोव्हेंबर) जातगणना सुरूकेली. तिचा अहवाल ९ नोव्हेंबरला राज्य सरकारला सादर केला जाणार आहे.

जखणगावचे लोकनियुक्त सरपंच डॉ. सुनील गंधे यांनी बैठकीत गावातील सर्व नागरिकांची जातनिहाय जनगणना करण्यासंदर्भात प्रस्ताव मांडला. मराठा आरक्षणासंबंधी तांत्रिक बाजूंची पूर्तता करण्यासाठी जातनिहाय गणना होणे आवश्यक असल्याचे म्हणणे त्यांनी मांडले. त्याला गावातील सेवा सोसायटीचे अध्यक्ष ॲड. बाळासाहेब कर्डिले यांनी अनुमोदन दिले व सर्व ग्रामस्थांनी हा ठराव सर्वानुमते संमत केला. मराठा आरक्षण व बदललेल्या परिस्थितीवर बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. गावातील सर्व जातीधर्माच्या लोकांनी मराठा आरक्षण आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी अनुकूलता दर्शवली.

जखणगावने राज्यात पहिल्यांदाच असे धाडस दाखवून जातनिहाय जनगणना करण्याची प्रक्रिया सुरु केली आहे. येत्या ९ दिवसात गावातील सर्व शासकीय, निमशासकीय कर्मचारी, मानधनावर काम करणारे सर्व सेवक व पदाधिकारी यांच्यामार्फत जनगणनेचे काम पूर्ण करण्यात येणार आहे व गुरुवारी ९ नोव्हेंबरला मुख्यमंत्री व मुख्य सचिवांना त्याचा अहवाल सादर केला जाणार आहे.

दरम्यान, जातगणनेच्या कामात हयगय करणाऱ्या कर्मचाऱ्यांचा व अडथळे निर्माण करणाऱ्या नागरिकांचा अहवाल ग्रामपंचायत कार्यालयाला सादर करण्याच्या सूचना डॉ. सुनील गंधे यांनी ग्रामसेवक व ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना दिल्या आहेत.




**गावपातळीवर जातनिहाय असा सर्व्हे झाल्याने आरक्षण मुद्यातील वास्तव लक्षात येईल व भविष्यात देशाला एक निर्णायक पाऊल उचलावे लागेल तरच सामाजिक एकोपा टिकेल.**

**डॉ. सुनील गंधे,सरपंच, जखणगाव**

## संपादकीय

# पर्यावरण पुरक दिवाळीची गरज

दिवाळी म्हणजे दीपोत्सव, दिव्यांचा सण, पणत्या, आकाशदिवे, रंगीबेरंगी दिव्यांच्या माळा, मिठाई आणि फराळाची देवाण–घेवाण, आनंदाचे उधाण, जुने मतभेद हेवेदावे विसरून एकमेकांना आनंदाने भेटण्याचे दिवस, नातेवाईक, भाऊ–बहीण यांच्या भेटीचा सण आणि त्याचबरोबर मुलांचा उत्साह, आनंद म्हणजे फटाके! फटाक्यांची आतषबाजी, धूमधडाका. रात्र झाली की हवेत उडणा–या रंगीबेरंगी फटाक्यांनी आसमंत उजळून निघतो. फटाक्यांच्या धूमधडाक्याने परिसर व्यापून जातो. मुलांच्या उत्साहाला आणि मोठ?ांच्या अतिउत्साहाला उधाण येते. वर्षभरात येणा–या सणांत दिवाळी सणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. या सणाचा थाटमाट पाहिला तर दिवाळीला सणांची महाराणी म्हणणेच योग्य ठरेल. दिवाळी ही महाराणी म्हणूनच तिचा थाटमाट मोठा असतो आणि ती येतेही अखंड दिव्यांच्या झगमगाटात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत. आता फटाक्यांचा अतिरेक व्हायला लागला म्हणून प्रदूषणाचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. सणाचा आनंद स्वत:पुरता उपभोगावा की त्यात सर्वांना सहभागी करून घ्यायचे याबाबत आपली मते पक्की ठरली की सणाचा आनंद निश्चितच वाढतो. म्हणूनच येथे आपण फक्त कमी आवाजाचे आणि शोभेचे फटाके गृहीत धरूया. शोभेचे फटाके अर्थात फुलबाजे, अनार, भुईचक्र यांच्या प्रकाशात लहान मुलांचे चेहरे किती उजळून निघतात. त्या नितळ चेह–यावरचा आनंद पाहताना आपणही आनंदी होतो. आनंद देणे आणि आनंद मिळविणे हीच या सणाची महती आहे. म्हणूनच दिवा अर्थात दीप हे या सणाचे प्रतीक आहे. दिवा दरवाजात तेवत राहिला तर घराचे प्रवेशद्वार उजळते. ज्याच्या घराचे प्रवेशद्वार मंगलमय तेथून हमखास लक्ष्मीचा प्रवेश होतोच. मात्र त्याचवेळी जर कानाचे पडदे फाडणा–या आणि घर हादरवणा–या मोठ?ा फटाक्याचा धमाकेदार आवाज झाला तर मात्र दचकून लक्ष्मी आल्या पावली परत जाण्याची शक्यता असते. म्हणून आत्मभान आणि सामाजिक भान ठेवून दिवाळीचा सण साजरा केला तर आनंद अधिक द्विगुणित होईल.

हेच फटाके ध्वनी आणि वायुपदूषणाला कारणीभूत ठरत असतात याकडे मात्र आपले लक्ष नसते किंवा असून सुद्धा त्याकडे कानाडोळा केला जातो. फटाक्यांच्या आवाजाने ध्वनिपदूषण तर होतेच, परंतु फटाक्यांच्या धुरामुळे हवेच्या पदूषणाचा स्तरही वाढतच जातो. यामुळे घशाचे आणि फुप्फुसाचे आजार वाढतात, वृद्धांना ध्वनी आणि वायुपदूषणाचा भयंकर त्रास होतो, लहान मुले, नवजात अर्भके, गरोदर स्त्रिया यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होऊ शकतो. याच पार्श्वभूमीवर दिल्लीत सवीच्च न्यायालयाने फटाके विकण्यास बंदी केली आहे. दिल्ली आणि राष्ट्रीय राजधानी परीक्षेत्रात (एनसीआर) फटाक्यांच्या विक्रीवर बंदी घालण्यात आली आहे. कोरोनाचा संसर्ग पाहता तो थांबविण्यासाठी आणि प्रदुर्षणावर आळा घालण्यासाठी महाराष्ट्र सरकारने दिवाळीमध्ये फटाके फोडण्यावर बंदी घालण्यात आली आहे.

# दिवाळी...महासम्राट बळीराजाचं पूजन करुन साजरी करा....!

**यवतमाळ:–** कृषी संस्कृतीचा महानायक महासम्राट बळीराजा हा सम्राट विरोचन व राणी विध्यांवलीचा पुत्र, सम्राट प्रल्हादाचा नातू, सम्राट हिरण्यकश्यपूचा पणतू, सम्राट बाणासुराचा पिता होय.

महासम्राट बळीराजा अत्यंत विद्वान, दयाळू, तत्त्–वेत्ता व जनकल्याणकारी राजा होता. त्यांनी आपल्या कर्तुत्वाने पुढल्या पिढीसाठी आदर्श निर्माण केला. शेतकरी, कारागीर आणि आदिवासी यांचा तो सखा आणि आदर्श होता. बळीराजाचे शत्रूही मानतात की बळीराजा हा अत्यंत उदार होता. म्हणूनच भाऊबीजेच्या दिवशी बहिण भावाला ओवाळते आणि म्हणते इडा पिडा टळू दे... बळीचे राज्य येऊ दे...!




घटस्थापनेपासून भाऊबीजेपर्यंत चा लोकोत्सव हा कृषी संस्कृतीचा वारसा सांगतो. कष्ठकरी शेतकऱ्यांची संस्कृती म्हणजेच बळीवंश. तीन ते चार हजार वर्षांपासून शेतकरी कष्ठकरी आणि आदिवासी यांनी आपली संस्कृती निर्माण केली हीच संस्कृती म्हणजे आजची कृषी संस्कृती म्हणजेच बळी वंश होय.

शेतकऱ्यांची आजची जी दयनीय स्थिती झालेली आहे, यामागे फक्त आर्थिक कारणे नाहीतच, तर सांस्कृतिक व वायमयीन कारणे सुद्धा आहेत. ज्या समाजाला आपल्या इतिहासातून आपले महानायक शोधता येतात, तोच समाज प्रगती करतो व देशावर राज्य करतो देशातील नैसर्गिक व मानवनिर्मित साधनसामग्रीवर अधिकार गाजवतो. आपला इतिहास आपण विसरलो, म्हणून कसलाच स्वाभिमान राहीला नाही. स्वाभिमान नसल्याने प्रगती नाही हे त्रिवार सत्य आहे.

महात्मा ज्योतिराव फुले यांनी गुलामगिरी या पुस्तकामध्ये सन १८७३ साली सहाव्या अध्यायामध्ये महासम्राट बळीराजाबद्दल संपूर्ण माहिती दिलेली आहे. म्हणूनच महात्मा ज्योतिराव फुले हे बळीराजाला शोधणारे पहिले इतिहास संशोधक आहे. महासम्राट बळीराजा हे कुळस्वामी आहेत व छत्रपती शिवाजी महाराज हे कुळवाडी भूषण? आहेत असे महात्मा ज्योतिराव फुले अभिमानाने सांगतात व लिहितात. या दोन्हीही महामानवांना शोधणारे महात्मा ज्योतिराव फुले हे पहिले इतिहास संशोधक आहे.

केरळमध्ये ओनम हा सण व संपूर्ण देशामध्ये दिवाळी हा सण मोठ्या उत्साहात महासम्राट बळीराजाच्या स्मरणार्थ साजरा केला जातो. म्हणून सर्वांनी येणारी दिवाळी? ही महासम्राट बळीराजाच्या प्रतिमेचे पूजन करून साजरी करा...??असे आवाहन बळीराजा स्वराज्य सेना ( एक सामाजिक संघटन) महाराष्ट्र राज्य तर्फे करण्यात येत आहे.

**नरेंद्र गद्रे** संस्थापक
बळीराजा स्वराज्य सेना
(एक सामाजिक संघटन)
मिशन:–अन्नदाता सुखी भव:म?

**स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,चंचलबेन स्कूल रोड, गजानन कॉलनी गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)**

# केंद्र पुरस्कृत योजना (भाग–१) जिल्हा परिषद सेस योजना

**योजना क्र. १ – बायोगॅस बांधणीकरिता पूरक अनुदान देणे**

योजनेचा उद्देश :– केंद्रपुरस्कृत राष्ट्रीय बायोगॅस योजनेंतर्गत बायोगॅस सयंत्र उभारणीसाठी केंद्र शासनाकडून लाभार्थीना अनुदान दिले जाते. मात्र बायोगॅस सयंत्र बांधकामासाठी रेती, सिमेंट, पाईपलाईन, वाळू, शेगडी, बांधकाम मजूरी इत्यादीचा खर्च जास्त येतो. जादा खर्चामुळे लाभार्थी सयंत्र बांधण्यापासून परावृत्त होतो. तो पारंपारिक लाकूड–शेणगोळया पारंपारिक पध्दतीकडे वळतो. पर्यायाने पर्यावरणास हानी पोहचते. त्याकरिता केंद्र पुरस्कत राष्ट्रीय बायोगॅस योजनेंतर्गत निवडलेल्या लाभार्थ्यांना पूरक अनुदान देणे.

अनुदान मर्यादा :– प्रति लाभार्थी रु. १० हजार पूरक अनुदान देय राहील.

**योजना क्र. २ :– शेतकऱ्यांना/ बचतगटांना/ग्रामसंघांना विविध सिंचन साहित्याचा पुरवठा करणे**

योजनेचा उद्देश :– शेतात लागवड होणाऱ्या पिकांकरिता संरक्षित पाण्याची आवश्यकता असते तसेच मोकाट पाणी देण्यामुळे पाण्याचा होणारा अपव्यय टाळणे, जमिनीचा पोत सांभाळणे, त्यामुळे शेतीच्या उत्पादनात वाढ होते. म्हणूनच शेतकऱ्यांना अनुदानाने डिझेल/ पेट्रोडिझेल/ विद्युत/सौर, पंपसंच इ तसेच HDPE, PVC पाईप उपलब्ध करुन देणे.


अनुदान मर्यादा :– प्रति लाभार्थी सिंचन साहित्य प्रति नग एकूण किंमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.३० हजार एवढे अनुदान देय राहील.


**योजना क्र. ३ :– शेतकरी / शेतमजूर/ बचतगट यांना विविध कृषी निविष्ठांचा पुरवठा करणे**


योजनेचा उद्देश :– विविध पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी, विविध कृषी निविष्ठा, सुधारित, संकरित बियाणे, जैविक, रासायनिक खते, सूक्ष्म मूलद्रव्ये, रासायनिक व जैविक किटकनाशके इत्यादी स्थानिक पातळीवर अनुदानाने उपलब्ध करुन देणे. तसेच बियाणे बदलाचा दर वाढविणे व एकात्मिक पीक संरक्षण उपायांचा अवलंब करण्यास प्रोत्साहन देणे. खतांच्या वापरातून जमिनीचा पोत सुधारणे व पिकांच्या उत्पादनात वाढ करणे.


अनुदान मर्यादा :– प्रति लाभार्थी एकूण किंमतीच्या ५०% किंवा











जास्तीत जास्त १ हजार रु. एवढे अनुदान देय राहील.

**योजना क्र. ४ :– शेतकरी / शेतमजूर / बचतगट यांना पिक संरक्षण औजारे पुरवठा करणे**

योजनेचा उद्देश :– शेतात लागवड होणाऱ्या पिकांवर निरनिराळया किडरोगांचा प्रार्दूभाव होतो. मात्र किटकनाशक फवारणी करिता स्प्रे–पंप नसल्याने शेतकरी फवारणी करु शकत नाहीत. यासाठी शेतकऱ्यांना तसेच बचतगटांना किटकनाशक फवारणीकरिता अनुदानाने पिक संरक्षण औजारे उपलब्ध करुन देणे.

अनुदान मर्यादा :– हस्त/ स्वयंचलित पिक संरक्षण औजारे स्वयंचलीत पिक संरक्षण औजारांवर किंमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु. १० हजार एवढे अनुदान देय राहील.

**योजना क्र. ५ :– शेतकरी / शेतमजूर / बचतगट यांना सुधारित कृषी औजारांचा पुरवठा करणे**

योजनेचा उद्देश :– विविध शेतीपिके, फळपिके व अन्न पिके यांचा उत्पादन खर्च पाहिला तर त्यामध्ये "मजूरी" या घटकावर मोठा खर्च होतो. त्याप्रमाणे शेतीच्या विविध कामांना वेळही जास्त लागतो. "मजूरी" या घटकावरील खर्च कमी व्हावा शिवाय शेतीची विविध कामे कमी वेळूत, मुदतीत व गुणवत्तापूर्ण होण्यासाठी सुधारित कृषी औजारांचा वापर वाढणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठी शेतकऱ्यांना तसेच बचतगटांना स्वयंचलित यंत्राने चालणारी तसेच मनुष्यबळाने चालणारी विविध सुधारित औजारे अनुदानाने पुरवठा करणे.

अनुदान मर्यादा :– प्रति औजार एकूण किंमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त.रु ५० हजार एवढे अनुदान देय राहिल

**योजना क्र. ६ :– शेतकरी/ शेतमजूर/बचतगट यांना सौर उर्जेवर आधारित साहित्याचा पुरवठा करणे**

योजनेचा उद्देश :– सौर उर्जेवर आधारित साहित्याच्या वापराद्वारे विजेच्या अनुपलब्धतेच्या समस्येवर मात करणे आणि अपारंपारीक उर्जा स्त्रोतांच्या वापरास प्रोत्साहन देणे.

अनुदान मर्यादा :– सौर उर्जा साहित्य प्रति नग किंमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.२५ हजार एवढे अनुदान देयराहील.

**योजना क्र. ७ :– कृषी क्षेत्रात प्लॅस्टिक तंत्रज्ञानाच्या वापरास प्रोत्साहन देणे.**

योजनेचा उद्देश :– तृणधान्य, कडधान्य, फळपिक, भाजीपाला, फूलशेती, अन्नपिके उत्पादन वाढीसाठी तसेच संरक्षण होण्यासाठी प्लास्टिक वापरास उदा. ठिबक सिंचन संच, तुषार सिंचन संच, प्लास्टिक मल्चिंग शीट, शेडनेट, पॉलिथिन पेपर व इतर प्लास्टिक, पॉलिथिन, पीव्हीसी, एचडीपीई, ताडपत्री, तोडणी व साठवणूक साहित्य (क्रेटस) इत्यादीस प्रोत्साहन देणे.

अनुदान मर्यादा :– प्लास्टिक पॉलिथिन, एचडीईपी ताडपत्रीसाठी प्रती लाभाथी एकूण किमतीच्या ७५% किंवा जास्तीत जास्त रु.२ हजार मर्यादेत अनुदान देय राहील.

**योजना क्र. ८ :– शेतकऱ्यांना पिक संरक्षणाकरिता काटेरी तार/सौर कुंपणासाठी अर्थ सहाय्य करणे**

योजनेचा उद्देश :– पिकाचे जनावरापासून संरक्षण करण्याकरिता ७५% अनुदानावर काटेरी तारांचा/सौर कुंपनाचा पुरवठा करणे. जिल्हयातील सर्व घटकातील व वर्गवारीतील शेतकऱ्यांना लाभ देण्यात येतात, संबंधित शेतकऱ्यांना काटेरी ताराचा/सौर कुंपनाचा उपयोग करता येईल.

अनुदान मर्यादा :– प्रति लाभार्थी प्रति एकर रक्कम रुपये १५ हजार किंवा प्रत्यक्ष खर्चाच्या ७५% यांपैकी कमी असेल ( प्रति लाभार्थी २ एकर क्षेत्र मर्यादेत). प्रति लाभार्थी शेतकरी यांनी कमीत कमी २० गुंठे ते जास्तीत जास्त २ एकर क्षेत्र मर्यादेत अनुदान देय राहील. २० गुंठेपेक्षा कमी क्षेत्रास अनुदान देय राहणार नाही.

**योजना क्र. ९ :– शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढीसाठी फूलशेती, औषधी वनस्पती, कंदमुळे लागवडीसाठी प्रोत्साहनपर अनुदान देणे**

योजनेचा उद्देश :– वैयक्तिक / सामूहिक पध्दतीने नव्याने फूलशेती लागवडीस चालना देणे. शेतकऱ्यांच्या शेतावर वैयक्तिक/सामूहिक पध्दतीने फुलपिकांची, औषधी वनस्पती व कंदमुळांची लागवड करुन शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ करणे व याद्वारे शेतकऱ्यांचे स्थलांतर रोखण्यासाठी मदत करणे व त्यासाठी शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे हा आहे. नव्याने फूलशेती लागवडीस चालना करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान देणे. (समाविष्ठ फूल पिके – मोगरा, सोनचाफा व गुलाब तसेच औषधी वनस्पती व कंदमुळे या पिकांसाठीच ही योजना लागू राहील.)

अनुदान मर्यादा :– एका शेतकऱ्यास प्रति १० गुंठे लागवडीस रक्कम रुपये १० हजार (अक्षरी रु.दहा हजार मात्र) या मर्यादेत, महत्तम २० गुंठे प्रति शेतकरी या प्रमाणात अनुदान देय राहील.

**योजना क्र. १० :– पद्मश्री सिंधूताई सपकाळ स्वाभिमान योजनेंतर्गत शेतकरी/शेतमजूर/ बचतगट यांना भाजीपाला विक्रीसाठी साहित्य तसेच ई–कार्ट पुरविणे.**

योजनेचा उद्देश :– भाजीपाला व शेतमाल नाशिवंत व नाजूक कृषी माल असलेने त्याची योग्य हाताळणी होणे आवश्यक आहे. भाजीपाला विक्री करताना हाताळणीसाठी प्लास्टीक क्रेट्स दिल्यास भाजीपाल्याची तात्पुरती साठवणूक व वाहतूक करणे शास्त्रीयदृष्ट्या योग्य ठरेल. तसेच भाजीपाला व शेतमालाची पध्दतशीर मांडणी करण्यासाठी लोखंडी स्टॅण्ड दिल्यास ग्राहक आकर्षित होऊन शेतकऱ्यांचा उत्पन्नात वाढ करणे तसेच ई–कार्ट (Electric Vehicle) असल्यामुळे इंधनाची बचत होते. शेतकऱ्याने स्वत:चा शेतमाल आठवडी बाजार तसेच निवासी संकुल येथे जाऊन थेट विक्री केल्यामुळे ग्राहकांना माफक दरात ताजा शेतमाल उपलब्ध होईल. तसेच शेतकरी आत्मनिर्भर होईल. हा या योजनेचा उद्देश आहे.

अनुदान मर्यादा :– भाजीपाला विक्री साहित्य संच प्रति लाभार्थी एकूण खर्चाच्या ९०% किंवा जास्तीत जास्त रु.९ हजार मर्यादेत अनुदान देय राहील. तसेच ई–कार्ट खरेदी करणा?या बचतगटास/ ग्रामसंघांना प्रति ई–कार्ट खरेदी किंमतीच्या ९०% किंवा जास्तीत जास्त रु.३ लाख मर्यादेत एवढे अनुदान देय राहील.

**योजना क्र. ११ :– मधुमक्षिका पालन व्यवसायास चालना देणे.**

योजनेचा उद्देश :– शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न मुख्यत: खरीप आणि रब्बी हंगामात लागवड होणाऱ्या पिकावर अवलंबून असते. बदलत्या हवामानामुळे शेतकऱ्यांचे आर्थिक उत्पन्न अनिश्चित असते. अशा वेळी शेतकऱ्यांना पूरक व्यवसायातून उत्पन्नात वाढ करता येते, त्यासाठी शेतकऱ्यांना मधुमक्षिका पालन संच पुरविणे.

अनुदान मर्यादा :– प्रति लाभार्थी खर्चाच्या ७५ टक्के किंवा जास्तीत जास्त रू ७ हजार ५०० एवढे प्रोत्साहनपर अनुदान देय राहील. उर्वरित २५ टक्के हिस्सा लाभार्थ्यांनी भरावयाचा आहे.

तरी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मुनज जिंदल (भा.प्र.से.), जिल्हा परिषद, ठाणे तसेच अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. रुपाली सातपुते, जिल्हा परिषद, ठाणे यांनी केले आहे. योजनांच्या अधिक माहितीसाठी कृषी विभाग, पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधावा.

**मनोज शिवाजी सानप**
**जिल्हा माहिती अधिकारी, ठाणे**

# नियमांना डावलून परिचराचे स्थानांतरण जिल्हा परिषद पशुसंवर्धन विभागाचा प्रताप

**देवेंद्र रामटेके**

**गोंदिया:** शासकीय कर्मचाऱ्यांची बदली करतांना या संदर्भात शासनाने काही मार्गदर्शक तत्वे ठरवून दिली आहेत. त्या नियमांना अनुसरूनच कर्मचाऱ्यांची बदली करण्यात येते. परंतु नियमात बसत नसताना सुद्धा एका चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांची नियमबाह्य बदली करण्याचा प्रकार जिल्हा परिषदेच्या पशुसंवर्धन विभागात उघडकीस आला. प्रकरण उजेडात येताच "तो मी नव्हेच" अशी भूमिका घेत विभागातील वरिष्ठ अधिकारी सारवासारवीच्या कामाला लागले आहेत.



गोंदिया जिल्हा परिषद अंतर्गत येणाऱ्या पशुसंवर्धन विभागाचे गोंदिया तालुक्यातील आसोली येथे श्रेणी–१चे पशुवैद्यकीय दवाखाना आहे. सदर दवाखाना वैद्यकीय अधिकाऱ्या अभावी मागच्या तीन वर्षापासून वाऱ्यावर आहे. असे असले तरी या दवाखान्यात येणाऱ्या शेतकऱ्यांना सेवा देण्याचे काम येथील एकमेव कर्मचारी नंदेश्वर नामक परिचर करीत आहे. परंतु त्याची ही मागच्या तीन महिन्यापूर्वी नियमबाह्य पद्धतीने बदली आरोग्य विभागात करण्यात आली.

सदर परिचर हा मागच्या अठरा वर्षापासून पशुसंवर्धन विभागात कार्यरत आहे. या विभागात मध्यंतरी काटी येथील दवाखान्यात सेवा बजावीत असताना त्याच्या मानेवर म्हशी ने सिंग मारल्यामुळे तो अपंग स्वरूपात आहे. असे असले तरीही त्याच्या हातून इमानेइतबारे विभागाची सेवा देण्याचे काम सुरू आहे. असे असतानाही केवळ आकसापोटी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्याची बदली नियमबाह्य पद्धतीने आरोग्य विभागात केली. नियमानुसार बदली हि ज्या विभागात कार्यरत आहे त्याच विभागातील अन्य ठिकाणी होणे गरजेचे होते परंतु तसे न करता केवळ अकसापोटी त्या गरीब कर्मचाऱ्याचे स्थानतरण आरोग्य विभागात करण्यात आले. आपल्यावर झालेल्या अन्यायाची तक्रार त्याने विभागीय आयुक्त तथा जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्या कडे केली. परंतु अद्यापही नियमबाह्य बदली करणाऱ्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांवर कोणतीच कारवाई झाली नाही. एवढेच नव्हे तर मागच्या तीन महिन्यापासून त्याचे पगार थांबविण्यात आले. त्यामुळे सदर परीचराच्या कुटुंबावर उपासमारीची पाळी आली आहे. आपल्यावर झालेला अन्याय त्वरीत दूर करून नियमबाह्य झालेली बदली रद्द करण्यात यावी अन्यथा कुटुंबा समवेत उपोषणास बसेन अशी मागणी मनोहर नंदेश्वर यांनी प्रसिद्धी पत्रकातून केली आहे.

सदर बदलीचे अधिकार आपल्याला नाही. हे अधिकार सामान्य प्रशासन विभागाला आहेत.त्यामुळे या बदलीशी आपला कोणताही संबंध नाही.– डॉ.कांतीलाल पटले जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जि.प. गोंदिया

# भ्रष्टाचार निर्मुलनासाठी दक्षता जनजागृती सप्ताहाचे आयोजन



**गोंदिया:** देशभर ३० ऑक्टोबर ते ५ नोव्हेंबर २०२३ या कालावधीत दक्षता जनजागृती सप्ताह साजरा करण्यात येत आहे. भ्रष्टाचारामुळे समाजाचे होणारे नुकसान टाळण्यासाठी दक्षता जनजागृतीसारखे उपक्रम नियमितपणे राबविण्यात येतात. भ्रष्टाचारमुक्त समाज निर्मितीसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग असणे गरजेचे आहे.

गोरेगाव, सडक अर्जुनी, सालेकसा व आमगाव तहसील कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, नवेगावबांध व आमगाव पोलिस स्टेशन येथे तसेच स्थानिक मार्केट परिसरात व शासकीय कार्यालयांना भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधून भित्तिपत्रके व पत्रके यांचे वाटप करण्यात आले तसेच नागरिकांना तक्रारी असल्यास लाचलुचपत प्रतिबंध विभाग गोंदिया येथे तक्रार नोंदवण्यासाठी प्रोत्साहित केले.

राज्य सरकारी अधिकारी किंवा कर्मचारी भ्रष्टाचार करताना, भ्रष्टाचारात गुंतलेला आढळल्यास त्वरित गोंदिया जिल्ह्यातील सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येते की शासकीय कार्यालय किंवा ऑफिसमध्ये कोणीही आपले काम करण्याकरता पैशाची किंवा लाचेची मागणी करत असल्यास/ कामाची अडवणूक करत असल्यास त्वरित अँटी करप्शन ऑफिस, गोंदिया येथे संपर्क साधावा.

ऑफिसला प्रत्यक्षात येणे शक्य नसल्यास खालील मोबाईल नंबर वरती संपर्क साधावा. आपल्याकडे येऊन तक्रार घेतली जाईल व तात्काळ कारवाई करण्यात येईल.

# गावकारागिरांना उभारी देणारी विश्वकर्मा योजना...!!

भारतीय ग्राम व्यवस्थेत खेडी स्वयंपूर्ण होती. कारण गावातल्या गरजा गावातच भागविल्या जात होत्या. त्यासाठी गावकारागीर असतं त्याला बारा बलुतेदार म्हणून ओळखले जात होते. काळानुरूप मोठे बदल झाले गावातली ही कारागीर मंडळी मागे पडली, मोठया प्रमाणात व्यवसायात तांत्रिकता आली. आता मात्र पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्या ७३ व्या वाढदिवसानिमित्त देशवासीयांना मोठी भेट दिली. त्यांनी पंतप्रधान विश्वकर्मा योजना सुरू केली आहे.नेमकी ही योजना काय आहे यावर टाकलेला हा प्रकाश...!!

पंतप्रधान विश्वकर्मा योजना ही पारंपारिक कौशल्य असलेल्या लोकांना त्यांचा व्यवसाय उभारण्यास मदत करेल. या योजनेत लोकांना केवळ कर्जच मिळणार नाही तर कौशल्य प्रशिक्षणही मिळणार आहे. लोहार, सोनार, कुंभार, सुतार आणि मोची यांसारखी पारंपारिक कौशल्ये असलेल्या लोकांना पंतप्रधान विश्वकर्मा योजनेचा लाभ मिळेल. अशा १८ पारंपरिक कामांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. या योजनेबद्दल सविस्तर जाणून घेऊया.




**तीन लाखांचे कर्ज मिळेल**

जर व्यक्तीकडे पारंपारिक कौशल्य असेल तर पीएम विश्वकर्मा योजनेअंतर्गत स्वतःचा व्यवसाय सुरूकरण्यासाठी कर्जाची सुविधा उपलब्ध असेल. या योजनेअंतर्गत ३ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मिळू शकते. पहिल्या टप्प्यात व्यवसाय सुरू करण्यासाठी एक लाख रुपयांचे कर्ज दिले जाते. यानंतर व्यवसाय विस्तारासाठी दुसऱ्या टप्प्यात २ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज उपलब्ध आहे. हे कर्ज फक्त ५ टक्के व्याजदराने मिळेल.

कौशल्य प्रशिक्षण

या योजनेत १८ पारंपरिक कामांचा समावेश करण्यात आला आहे. या १८ ट्रेडमध्ये लोकांना प्रशिक्षण देण्यासाठी मास्टर ट्रेनर्सच्या माध्यमातून प्रशिक्षणही दिले जाणार आहे. तुम्हाला दररोज ५०० रुपये स्टायपेंड देखील मिळेल. याशिवाय पीएम विश्वकर्मा प्रमाणपत्र, ओळखपत्र, मूलभूत आणि प्रगत प्रशिक्षणाशी संबंधित कौशल्य अपग्रेड, १५,००० रुपयांचे टूलकिट प्रोत्साहन, डिजिटल व्यवहारांसाठी प्रोत्साहन देखील दिले जाईल.

**अशी लागेल पात्रता**

१. भारताचा नागरिक असणे आवश्यक आहे.
२. योजनेमध्ये समाविष्ट असलेल्या १८ व्यापारांपैकी कोणत्याही एकाशी संबंधित असणे आवश्यक
३. वय १८ वर्षांपेक्षा जास्त आणि ५० वर्षांपेक्षा कमी असावे.
४. मान्यताप्राप्त संस्थेचे संबंधित ट्रेडचे प्रमाणपत्र असावे.
५. योजनेत समाविष्ट केलेल्या १४० जातींपैकी कोणत्याही एका जातीचा असावा.

अशी लागतील कागदपत्रे

योजनेचा लाभ घेण्यासाठी लाभार्थ्याकडे आधारकार्ड, पॅनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, जातीचा दाखला, ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, पासपोर्ट आकाराचे छायाचित्र, बैंक पासबुक आणि मोबाईल नंबर असणे आवश्यक आहे.

**अर्ज कसा करायचा**

१. सर्वप्रथम अधिकृत वेबसाइट pmvishwakarma.gov.in वर जा.
२. येथे Apply Online लिंकवर क्लिक करा.
३. पीएम विश्वकर्मा योजनेत नोंदणी करा.
४. नोंदणी क्रमांक आणि पासवर्ड तुमच्या मोबाईलवर एसएमएसद्वारे येईल.
५. यानंतर, नोंदणी फॉर्म पूर्णपणे वाचा आणि तो पूर्णपणे भरा.
६. भरलेल्या फॉर्मसह सर्व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करा आणि अपलोड करावे.

या विश्वकर्मा योजनेतून अधिकाधिक लोकांना आपल्या व्यवसायात गतिशीलता आणण्यासाठी मदत होणार आहे. व्यवसायाला लागणाऱ्या अत्याधुनिक मशीन त्याअनुषंगाने लागणाऱ्या गोष्टी यातून करता येणार आहेत. ही नवी उभारी घेण्यासाठी एक उत्तम पर्याय सरकारने निर्माण करून दिला आहे. त्यासाठी तात्काळ नोंदणी करता येईल. यासाठी सहायक आयुक्त कार्यालय, जिल्हा क्रीडा संकुल,भंडारा येथील कार्यालयाशी संपर्क करावा. अधिकाधिक लोकांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले आहे.

**(श्रीमती.शैलजा वाघ दांदळे)**
जिल्हा माहिती अधिकारी,भंडारा

# वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या तरुण-तरुणींनो मतदार यादीत नाव नोंदवा-जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे


प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध

**गोंदिया :** १ जानेवारी २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीच्या संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली असून ज्यांनी अद्याप मतदार यादीत नाव नोंदविले नाही अशा पात्र तरुण-तरुणींनी जास्तीत जास्त प्रमाणात नाव नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे. जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. उपजिल्हाधिकारी (निवडणूक) किरण अंबेकर, आपत्ती व्यवस्थापन अधिकारी राजन चौबे व नायब तहसिलदार अप्पासाहेब व्हनकडे यावेळी उपस्थित होते.

मतदान केंद्राचे सुसुत्रीकरण आणि प्रमाणिकरण अंतर्गत गोंदिया जिल्ह्यातील ६३-अर्जुनी मोरगांव विधानसभा मतदार संघात ०२ नविन मतदान केंद्र (२३०-तिडका व २५३-अर्जुनी मोरगांव) तयार करण्याचे प्रस्ताव मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांना सादर करण्यात आले असून भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे १८ ऑक्टोबर २०२३ चे पत्रान्वये सदर नविन मतदान केंद्रांना मंजुरी प्रदान करण्यात आली आहे. त्यानुसार भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांचे पत्र दि.१८.१०.२०२३ अन्वये मंजुर मतदान केंद्रांची संपुर्ण यादी जिल्हाधिकारी कार्यालय येथील नोटीस बोर्ड, सर्व उपविभागीय कार्यालयातील नोटीस बोर्ड व सर्व तहसिल कार्यालयातील नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. तसेच गोंदिया जिल्ह्यातील सर्व मान्यता प्राप्त राजकीय पक्ष यांना सदर यादी पुरविण्यात आ-लेली आहे.

विधानसभा मतदारसंघ ६३-अर्जुनी मोरगांव, ६४-तिरोडा, ६५-गोंदिया, ६६-आमगाव (ड्ढ). यामध्ये मतदान केंद्राची संख्या एकूण १२८४ असून मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यांची (BLO) संख्या सुध्दा १२८४ आहे.

गोंदिया जिल्ह्यातील विधानसभा मतदार संघात दिनांक २७ ऑक्टोबर २०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आलेल्या प्रारुप मतदार यादी प्रमाणे मतदार संख्या पुढील प्रमाणे आहे. एकूण चार विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार- ५,४५,९०२. स्त्री मतदार- ५,५०,५४८. इतर- ०९, असे एकूण मतदार- १०,९६,४५९ आहेत.

जिल्ह्यातील सेनादलातील चार विधानसभा मतदारसंघात पुरुष मतदार- १८२४, स्त्री मतदार- १०४, एकूण मतदार- १९२८ आहेत.

मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) यांचेद्वारे २१ जुलै २०२३ ते २१ ऑगस्ट २०२३ पर्यंतच्या कालावधीत मतदारांची प्रत्यक्ष घरोघरी भेट देवून पताळणी करण्यात आली असून एकूण चार विधानसभा मतदारसंघात मृत मतदार- २६,२५४, स्थलांतरीत- २०,४६३, दुबार- १,२९९, असे एकूण ४८,०१६ मतदार वगळण्याची प्रक्रिया सुरु आहे.

भारत निवडणूक आयोगाचे ४ जुलै २०२२ च्या पत्रानुसार गोंदिया जिल्ह्यात १ ऑगस्ट २०२२ पासून मतदार यादीतील मतदारांकडून ऐच्छिकपणे आधारची माहिती संग्रहित करण्याबाबतची मोहिम सुरु असून आतापर्यंत चारही विधानसभा मतदारसंघात ६,८५,९८० मतदारांनी आपला आधार क्रमांक जोडणी केलेली असून ४,१०,४७९ मतदार आधार क्रमांक जोडणीसाठी शिल्लक आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील जास्तीत जास्त मतदारांनी आ-पले आधारकार्ड मतदार यादीशी लिंक करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी केले आहे.

एकत्रीकृत प्रारुप मतदार यादी प्रसिद्ध केल्यानंतर ९ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती स्वीकारण्यात येणार आहेत. २६ डिसेंबरपर्यंत दावे व हरकती निकाली काढण्यात येणार आहेत. यादीच्या अंतिम प्रसिद्धीसाठी १ जानेवारी २०२४ पर्यंत निवडणूक आयोगाची परव-ानगी घेऊन डाटाबेस अद्ययावत करणे तसेच पुरवणी याद्यांची छपाई करण्यात येणार आहे. अंतिम मतदार यादी ५ जानेवारी २०२४ रोजी प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी दिली.

शहरी भागात कमी प्रमाणात मतदार नोंदणी झाल्याचे निदर्शनास आले आहे. शहरी भागात मतदार नोंदणी वाढविण्यासाठी प्रयत्न केले जाणार असून नागरिक मतदार नोंदणीसाठी वंचित राहू नये याकडे लक्ष दिले जाईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी सांगितले.

# आयुष्मान ग्रामपंचायतीचा होणार सत्कार

## जिल्ह्यात ७ लाख ९१ हजार १३१ लाभार्थी; ५ लाखांपर्यंत मोफत उपचार सुविधा




**गोंदिया:** आयुष्मान भारत योजनेंतर्गत शासनाने ५ लाखापर्यंत मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे. यासाठी आयुष्मान कार्ड तयार करणे अनिवार्य आहे. यातूनच जिल्ह्यात सदर योजनेचे एकूण ७ लाख ९१ हजार १३१ लाभार्थी असून यापैकी आतापर्यंत २ लाख ३२ हजार ९७६ लाभार्थ्यांनी आयुष्मानचे कार्ड काढल्याची माहिती आरोग्य विभागाने दिली असल्याची माहिती जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांनी दिली आहे.

शासनाने आयुष्मान भारत योजनेची व्याप्ती वाढवल्याने गोरगरिबांना आरोग्यविषयक उपचार घेण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. १३५६ आजारांवर आता मोफत उपचार मिळणार आहे. महात्मा फुले जनआरोग्य योजना आणि केंद्र सरकारच्या पंतप्रधान आयुष्मान योजनेचे एकत्रीकरण करुन या योजने अंतर्गत ५ लाखापर्यंत मोफत उपचाराची सुविधा नागरिकांना मिळणार असल्याने लोकांनी आ-पले आजाराचे कवच गोल्डन कार्ड म्हणजेच आयुष्मान कार्ड काढुन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन अनिल पाटील यांनी केले आहे.

जिल्ह्यात ५४८ ग्रामपंचायती असुन आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचे लाभार्थी हे २०११ साली झालेल्या सामाजिक, आर्थिक व जात निहाय जनगणनेच्या आधारावर असून या यादीत नाव असणारा व्यक्ती या योजनेचे पात्र लाभार्थी आहेत. प्रत्येक ग्रामपंचायती कार्यक्षेत्रात पात्र आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी शिल्लक आहे.

ग्रामपंचायती प्रशासनाने आपल्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान गोल्डन कार्ड काढुन घेण्याचे नियोजन करावे. जिल्हा परिषदेमार्फत असे आयुष्मान ग्रामपंचायतीचा सत्कार करण्यात येणार असल्याचे मा.अनिल पाटील यांनी म्हटले आहे.भविष्यात आजार होवुन उपचारासाठी बिकट आपत्ती उदभवु नये यासाठी आजच आयुष्मान कार्ड काढुन योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन मा.अनिल पाटील यांनी केले आहे.

हे कार्ड सीएससी केंद्र, आपले सरकार केंद्र, ग्रामपंचायतीचे सेतु केंद्र, या योजनेअंतर्गत अंगीकृत रुग्णालय व सद्य स्थितीत आरोग्य विभागामार्फत ई-के.वाय.सी. द्वारे तयार करण्यात येत असल्याची माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. नितीन वानखेडे यांनी दिली आहे.

समाजातील सर्व घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहोचवण्यासाठी तसेच आरोग्याची सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाची महत्त्वाकांक्षी "आयुष्यमान भव' मोहीम जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे. या मोहिमेंतर्गत आरोग्याशी संबंधित विविध योजनांचा समावेश करण्यात आला आहे. आरोग्य विभागामार्फत आयुष्मान गोल्डन कार्ड काढण्याविषयी महत्वपुर्ण जनजागृती करण्यात येत आहे. आजार होण्याची वाट न बघता आजच आपले आयुष्मान गोल्डन कार्ड काढुन जबाबदार नागरिक बनुन आपल्या कुटुंबाची काळजी घेण्याबाबत आवाहन जिल्हा आरोग्य प्रशाननाने केले आहे.

आयुष्मान भारत योजनेंतर्गत सहभाग नोंदवून गोल्डन कार्ड काढण्यासाठी गावातील सरकारी दवाखाना, ग्रामपंचायत, नजीकचे सीएससी केंद्र, आपले सरकार केंद्र येथे संपर्क करुन ते कार्ड काढू शकता येत आहे. त्याठिकाणी लाभधारकाला सदरील कार्ड मोफत काढून दिले जात असल्याची महिती मा.अनिल पाटील यांनी दिली आहे. तसेच आता आयुष्मान कार्ड बनवणे अधिक सोप झाले असून कोणताही लाभार्थी घरी बसूनच हे आपले पाच प्रकारच्या टप्प्यात जावून काढू शकतो.

आयुष्मान भारत योजना सुरू झाल्यापासून जिल्ह्यातील ७२ हजार लाभार्थ्यांनी याचा लाभ घेतला असून या रुग्णावर ठरवून दिलेल्या अंगीकृत रुग्णालयात उपचार करण्यात आले आहेत. पाच लाखांपर्यंत मोफत वैद्यकीय उपचार, विविध दवाखान्यांचा समावेश, उपचाराचा पाच लाखापर्यंत खर्च शासन करणार असून कुटुंबातील सर्व व्यक्तींना ही योजना लागू राहील अशी माहिती प्रधानमंत्री जनआरोग्य योजनेचे जिल्हा समन्वयक डॉ. जंयती पटले यांनी दिली आहे.

आयुष्मान भारत योजना ही सर्वसामान्यांच्या हिताची आहे. १३५६ आजारांवर मोफत उपचाराचे आयुष्मान कार्ड काढण्यासाठी ग्रामपंचायतीने पुढाकार घ्यावा. जिल्ह्यात ७ लाख ९१ हजार १३१ एवढे लाभाथी असुन या लोकांना आयुष्मान कार्ड लवकर मिळण्याच्या दृष्टिकोनातुन गावातील आशा सेविका, ग्रामपंचायत , उपकेंद्र , प्राथमिक आरोग्य केंद्र. सीएससी केंद्र, आपले सरकार केंद्र ई. ठिकाणी आयुष्मान कार्ड तयार करण्याची सोय उपलब्ध तयार करण्यात आली आहे. आता लाभार्थी सुद्धा स्वत: आपल्या घरीच आयुष्मान कार्ड तयार करु शकतो असे तंत्रज्ञान निर्माण केले आहे. तरी या योजनेचा लाभार्थ्यांनी लाभ घ्यावा यासाठी आरोग्य विभागाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती होत आहे. जिल्ह्यात ५४८ ग्रामपंचायती असुन प्रत्येक ग्रामपंचायती कार्यक्षेत्रात पात्र आयुष्यमान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ घेणारे लाभार्थी शिल्लक आहे. ग्रामपंचायती प्रशासनाने आपल्या कार्यक्षेत्रातील १०० टक्के पात्र लाभार्थ्यांचे आयुष्मान गोल्डन कार्ड काढुन घेण्याचे नियोजन करावे. जिल्हा परिषदेमार्फत असे आयुष्मान ग्रामपंचायतीचा सत्कार करण्यात येणार आहे.

# शुद्ध व थंडगार पाण्याने भारावले अंभोरावासी




**गोंदिया:** आपल्या गावातील नागरिकांना शुद्ध व थंडगार पाणी (आरोयुक्त) उपलब व्हावे अशी ग्रामपंचायत प्रशासनाची धडपड होती. त्याच अनुसंगाने ग्रामपंचायत प्रशासनाने आपल्या गावातील नागरिकांना अगदी अल्प दरात शुद्ध व थंडगार पाणी (आरोयुक्त) उपलब्ध करुन दिले. आता गावातच सुद्धा व थंडगार पाणी मिळत असल्याने गोंदिया तालुक्यातील अंभोरा येथील नागरिक भारावले आहेत.

आपल्या गावातील नागरिकांना शुद्ध व थंड पाणी उपलब्ध व्हावे यासाठी मागच्या अनेक वर्षांपासून ग्रामपंचायत प्रशासनाचे प्रयत्न सुरू होते. अशातच पंधरा वित्त आयोगाची निधी उपलब्ध होताच त्यातून जवळपास चार लक्ष रुपये खर्च करुन गावातील ग्रामपंचायत परिसरात आरो प्लांट बसविण्यात आले. त्यातून सुद्ध आणि तेही थंडगार पाणी अगदी अल्प दरात गावकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात येत आहे. आता गावातच थंडगार पाणी तेही अगदी अल्प दरात उपलब्ध होत असल्याने गावकरी दररोज पिण्यासाठी मोठ्या प्रमाणात उपयोग करित आहेत. एवढेच नव्हे तर आपल्या घरातील आयोजित समारंभात सुद्धा सदर पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपयोग करित आहेत.

गावातच आरो चे पाणी आणि तेही अगदी अल्प दरात उपलब्ध झाल्याने गावकऱ्यांची मोठी आर्थिक बचत होत आहे. एवढेच नव्हे तर गावात होणाऱ्या मृत्यू, लग्न, तथा इत्तर समारंभात अगदी अल्प दरात मिनी टँकरद्वारे ग्रामपंचायत प्रशासन गावकऱ्यांना मुबलक पाणी उपलब्ध करून देत आहे. ग्रामपंचायत प्राशासना द्वारे करण्यात येत असलेल्या लोकोपयोगी कार्यामुळे येथील नागरिकांनी समाधान व्यक्त करीत ग्रामपंचायत प्रशासनाचे आभार मानले आहे. गावात विविध सुविधांची निरंतर पूर्तता व्हावी म्हणून येथील सरपंच जाननबाई लक्ष्मण चौधरी, उपसरपंच सारिका सावनकर, सदस्य राजेश रामटेके, सुरेश भिमटे, चिंतामण चौधरी, अश्वजीत गणवीर, रीता चौधरी, खुमेश्वरी चौधरी,विमल रामटेके, बिपतबाई पटले, ग्रामसेवक दीपक रेवतकर, सामाजिक कार्यकर्ते लक्ष्मण चौधरी, ग्रा.पं.कर्मचारी जाफर शेख, प्रमोद काटेकर, अशोक श्यामकुवर प्रयत्नशील आहेत.

# आ.विजय रहांगडाले यांच्या हस्ते किंडगीपार ग्रा.पं.भवनाचे भूमिपूजन



**तिरोडा:-** गोंदिया तालुक्यातील डोंगरगाव व किंडगीपार एकच ग्रा.पं.असून किंडगीपार ग्रा.प. वेगळी करण्याबाबत नागरिकांची मागणी होती यावर तिरोडा गोरेगाव विधानसभा क्षेत्राचे आमदार विजय रहांगडाले यांनी शासनाकडून सन २०१९ ला किंडगीपार ग्रा.प.स्वतंत्र करवून दिली व ग्रामविकास निधी २५१५ अंतर्गत ग्रा.प.भवन बांधकामाकरिता १५.०० लक्ष मंजूर करवून सदर वास्तूचे भूमि पूजन आमदार महोदयांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी प्रामुख्याने जि. प. सदस्य सौ. दिपाताई चंद्रिकापुरे, व प. स. सदस्य सौ. शैलजाताई सोनवाणे,सौ. विद्याकला ताई पटले, सरपंच लताबाई अश-ोक उईके, कोमेश्वरी नरेंद्र टेंभरे, भूमेश्वरी सुलाखे, श्री विकास शेंद्रे, उपसरपंच भोजलाल टेंभरे , ग्रा.प.सदस्य सागरा मस्करे, नरेंद्र टेंभरे , कल्पना शरणागत, धनेश्वरी मडावी, तुलसीराम मानेगुडे, शामाताई सोरकुरे, महेंद्र उके पोलीस पाटील फानिषा टेकाम, तमूस अध्यक्ष नरलाल मोहारे, अशोक उईके, नरेंद्र टेंभरे, भोजराज सुल-ाखे व गावकरी उपस्थित होते.

# ब्रम्हपुरी वन विभागात वाघिणी पाठोपाठ वाघ जेरबंद



**चंद्रपूर :** ब्रम्हपुरी वन विभागात तीन जणांचा बळी घेणाऱ्या वाघिणी पाठोपाठ तिचा साथीदार नर वाघही सोमवारी सकाळी आठच्या सुमारास जेरबंद करण्यात वन खात्याला यश आले. गेल्या आठवड्यात लागोपाठ तीन घटनांमध्ये वाघाच्या हल्ल्यात तिघांना जीव गमवावा लागल्याची माहिती आहे. २९ ऑक्टोबर रोजी पळसगाव वन परिक्षेत्रातील बेल-ारा येथे एका मेंढपाळाचा वाघाने बळी घेतला आणि त्यानंतर दुसऱ्या दिवशी पुन्हा खडसांगी वन परिक्षेत्रात वाघाच्या हल्ल्यात एका शेतकऱ्याचा मृत्यू झाला. त्यानंतर १ नोव्हेंबर रोजी हळदा गा-वातील सैत्राबाई नामदेव कामडी (७०) या महिलेला ब्रह्मपुरी वनविभागाच्या आवळगाव उपक्षेत्रातील हळदा बीटमधील कंपार्टमेंट क्रमांक ११६८ मध्ये शेतात भात कापणी करत असताना वाघाने ठार केले. वनविभागाने कॅमेरा ट्रॅप बसवल्यानंतर या हळदा घटनेत वाघ-ाचे दोन मोठे पिल्ले सामील असल्याची माहिती मिळाली.

तेव्हापासून ब्रह्मपुरी वन विभागाचे वन कर्मचारी कुटुंबापासून दूर गेलेल्या या दोन मोठ्या पिल्लांच्या हालचालींवर लक्ष ठेवून होते. त्यामुळे काल दोन ते अडीच वर्षे वयाच्या वाघिणीच्या स्थळाची माहिती मिळताच ती सायंकाळी ४ वाजता बेशुद्ध अवस्थेत सापडली आणि आज सकाळी ८.३० वाजता पुन्हा त्याच परिसरात तिचा सुमारे दोन ते अडीच वर्षे वयाचा एक नर वाघ पकडला गेला असून त्यालाही पकडण्यात यश आले आहे. या दोन्ही वाघांनी परिसरात पुन्हा कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि मानव-वन्यजीव संघर्ष वाढू नये म्हणून त्यांना जेरबंद करणे आवश्यक होते.

त्याअंतर्गत आज या दोन वाघांना जेरबंद केल्याने वनविभाग आणि तेथील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. डॉ आर. एस. खोब्रागडे, पशुवैद्यकीय अधिकारी (वन्यजीव) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प आणि आर.आर. ढ. झीरारङ्गह अउ मराठा, पोलीस नाईक (शूटर) ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर, राकेश आहुजा जीवशास्त्रज्ञ, वनविभाग ब्रम्हपुरी, या पथकाने त्याला शांत करून पकडले व ही कारवाई यशस्वीपणे पार पाडली.शेंडे वन परिक्षेत्र अधिकारी (प्रा.) दक्षिण ब्रह्मपुरी यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. आरआरटी सदस्य दिपेश. डी.टेंभुर्णे योगेश.डी.लाकडे, गुरु नानक व्ही.ढोरे, वसीम एन. शेख, विकास. एस.ताजने, प्रफुल.एन.वाटगुरे, ए. डी. कोरपे आर.आर. टी. चालक, ए. एम.दांडेकर, आरआरटी वाहन चालक, नूर अली सय्यद, जय सहारे आदी सहभागी होते.

# कवी बिसेन यांच्या "मृदगंध' व "असंच काहीतरी' या कविता संग्रहाचे प्रकाशन



**गोंदिया: -** भिन्न भाषा साहित्य मंडळ, गोंदिया आणि अखिल भारतीय साहित्य परिषद गोंदिया जिल्हा युनिट, नवी दिल्ली यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवार, २८ ऑक्टोबर रोजी गजानन कॉलनी येथील संत गजानन महाराज देवस्थानच्या सभागृहात कवी गोवर्धन बिसेन "गोकुल' यांच्या "मृदगंध' या मराठी काव्यसंग्रहाचे आणि चिरंजीव बिसेन यांच्या "असंच काहीतरी' या मराठी काव्यसंग्रहाचे प्रकाशन अ. भा. साहित्य परिषदेचे प्रांताध्यक्ष, प्रसिद्ध पोव-ारी, हिंदी व मराठी भाषिक कवी, विचारवंत व साहित्यिक एड. लखनसिंह कटरे यांच्या हस्ते माजी प्राचार्य व प्रसिद्ध साहित्यिक डॉ. हरिनारायण चौरसिया यांच्या अध्यक्षतेखाली व सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता संजय कटरे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

पुस्तक प्रकाशनाच्या वेळी कवी गोवर्धन बिसेन यांच्या पत्नी तेजेश्वरी बिसेन, चिरंजीव बिसेन यांच्या पत्नी लक्ष्मी बिसेन यांच्यासह साहित्यिक आणि काव्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन ज्येष्ठ कवी संगीतकार रमेश शर्मा यांनी तर आभार चिरंजीव बिसेन यांनी मानले.

या विषयावर अतिथी एड. लखनसिंह कटरे म्हणाले की, सध्याच्या काळात तुम्हाला प्रत्येक गल्लीबोळात कवी दिसतील, मात्र त्यांच्यातील कविता लिहिण्याचे कर्तव्य आणि कर्तव्य खऱ्या अर्थाने कोण पार पाडत आहे, हे जाणून घेणे अत्यंत गरजेचे आहे. गोवर्धन बिसेन "गोकुल' यांचा हा प्रयत्न त्यांच्या "मृदगंध'या संग्रहात फलदायी ठरतो. डॉ. हरिनारायण चौरसिया म्हणाले की, जीवन, जग आणि समाज कवितेत अनुभवायला मिळतो. बहुधा या गोष्टीची पूर्णता कविद्वयाच्या काव्यसंग्रहात नक्कीच दिसून येईल. अभियंता संजय कटरे व रमेश शर्मा यांनी दोन्ही कवींचे अभिनंदन केले.

चिरंजीव बिसेन आणि गोवर्धन बिसेन "गोकुल' यांनी आपापल्या काव्यसंग्रहावर मनोगत व्यक्त केले. पाहुण्यांचे स्व-ागत छगन पंचे "छगन' , अशोक चन्ने, मनोज बोरकर "मुसव्विर', सुरेश बंजारा, सुरेंद्र जगणे, अलका पारधी, कांताबाई बिसेन व सदस्यांनी केले. पुस्तक प्रकाशनानंतर साहित्य मंडळाचा मासिक काव्य परिसंवादही पार पडला, त्यात कवींनी कवितांचे पठण केले. साहित्य मंडळाच्या मासिक काव्य परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ कवी प्रकाश मिश्रा होते. अतिथी म्हणून गजानन महाराज देवस्थ-ानचे उपाध्यक्ष बी. ए. पटले होते. सर्वश्री यादवराव चौधरी, छगन पंचे "छगन', सुरेश बंजारा, निखिलेशसिंग यादव, चंद्रप्रकाश बनकर, मनोज बोरकर "मुसाविर', सुरेंद्र जगणे, गोवर्धन बिसेन "गोकुल' , चिरंजीव बिसेन "सीपी' आदींनी काव्यवाचन केले. या वेळी ज्येष्ठ कवी व साहित्य मंडळाचे निमंत्रक शशी तिवारी यांच्यासह साहित्यप्रेमी उपस्थित होते.

# ओबीसी मुलांची फाइल अडली

## भेदभाव कायम: राज्यातील ३६ वसतिगृहांचा प्रश्न पडला धूळखात

**गोंदिया:** इतर मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठीची वसतिगृहे आणि आधार योजनेसंबंधीची फाइल वित्त विभागात काही महिन्यांपासून अडली आहे. त्यामुळे ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांची कोंडी झाल्याचे चित्र आहे.

राज्यात ओबीसी विद्यार्थ्यांसाठी ३६ जिल्ह्यात ३६ आणि विद्यार्थिनीसाठी ३६ वसतिगृहे उभारण्याची ओबीसी कल्याण विभागाची योजना आहे. ही वसतिगृहे उभारण्यासाठी जागा मिळणे व त्यानंतर ती उभारणे यासाठी बराच अवधी लागला असता म्हणून भाडेतत्वावर ही वसतिगृहे घेण्याचा निर्णय झाला. त्यासाठी ७३ कोटी रुपये आधीच मंजूर झाले आहेत. मात्र ही रक्कम मुख्यत्वे भाडे देण्यासाठी वापरली जाणार आहे.

या वसतिगृहांमध्ये सोई-सुविधा देण्यासाठी (जसे पलंग,टेबल, खुर्च्या, संगणक, वॉटर प्युरिफायर, पंखे आदी) ३९ कोटी रुपयांची गरज आहे. त्यासाठीचा प्रस्ताव वित्त विभागात अडला असल्याचे सुत्रांनी सांगितले.

### ना आधार, ना छत

**अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहे आधीपासूनच आहेत. त्यांना या वसतिगृहांमध्ये प्रवेश मिळू शकत नाही. अशांसाठी स्वाधार योजना आहे. ४० हजार विद्यार्थ्यांना बाहेर खोली करुन राहण्यासाठी भाडे दिले जाते. वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या आदिवासी विद्यार्थ्यांना बाहेर राहण्यास स्वयंम ही योजना आहे. त्या अंतर्गतही वर्षभराचे भाडे दिले जाते. मात्र ओबीसी विद्यार्थ्यांसाठी आतापर्यंत एकही वसतिगृह सुरु होवू शकलेले नाही.**

**वसतिगृहे असतील तर मग आधार योजना ओबीसी विद्यार्थ्यांसाठी राबविता येणार नाही. अशी भूमिका वित्त विभागाने आधी घेतली. अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींसाठी नियमांमध्ये भेदभाव होता कामा नये.**

**उमेश कोर्राम, सयोंजक ओबीसी युवा अधिकार मंच**

**ओबीसी विद्यार्थ्यांसाठीची वसतिगृहे तातडीने सुरु व्हावीत यासाठी आमचा विभाग सातत्याने पाठपुरावा करत आहे. वित्त मंत्री अजित पवार हेही त्यासाठी अनुकूल आहेत. लवकरच निर्णय होईल.**

**अतुल सावे, ओबीसी कल्याण मंत्री**



### काय आहे आधार योजना?

**☆वसतिगृहेबाह्य जी आधार योजना प्रस्तावित आहे. त्या योजनेचा लाभ प्रत्येक जिल्ह्यात ६०० या प्रमाणे ३६ जिल्ह्यात २१ हजार ६०० विद्यार्थ्यांना दिला जाणार आहे. ओबीसी वसतिगृहांसाठी भाडे तत्वावर ५६ ठिकाणी इमारती निश्चित करण्यात आल्या आहेत.**

**☆मुलांच्या प्रत्येक वसतिगृहात १०० आणि मुलींच्या वसतिगृहात १०० अशी प्रवेश मर्यादा असेल. या वसतिगृहांमध्ये ९० टक्के विद्यार्थी ओबीसी (व्हीजेएनटींसह) असतील तर अन्य १० टक्के विद्यार्थी असतील असे प्रस्तावित करण्यात आले आहे.**

**☆२६ कोटी रुपयांच्या खर्चास मान्यता मिळाल्यानंतरच ही वसतिगृहे सुरु करता येणार आहेत.**

# आसोली-नवरगाव(कला) रस्ता देतोय अपघाताला निमंत्रण, बांधकाम विभागाचे दुर्लक्ष



**गोंदिया:-** मागच्या अनेक महिन्यापासून गोंदिया तालुक्यातील आसोली-नवरगाव (कला) रस्ता अत्यंत खराब झाला असून या रस्त्यावरुन नागरिकांना चालणे दुरापस्त झाले आहे. असे असले तरी या रस्त्याच्या दुरुस्तीकडे बांधकाम विभागाचे दुर्लक्ष दिसून येत आहे. त्यामूळे परिसरातील नागरिकांत रोष दिसून आहे.

तालुक्यातील अत्यंत वर्दळीचा मार्ग म्हणून या मार्गाची ओळख आहे. परिसरातील नवरगाव (कला), करंजी, कलीमाटी, पांजरा, घाटटेमनी, गिरोला, तसेच कामठा परिसरातील अनेक गावातील नागरिक गोंदियाला येण्या-जाण्यासाठी याच मार्गाचा उपयोग करतात. तसेच या मार्गावर मोठया प्रमाणावर शाळकरी मुलांची वर्दळ असते. या शिवाय या मार्गावरुन जड वाहने वाहतूक करीत असतात. जड वाहनांच्या वाहतुकीमुळे हा रस्ता अत्यंत खराब झाला असून जागोजागी मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. जड वाहन आले की प्रवाशांना व विद्यार्थ्यांना जीव मुठीत धरुन चालावे लागत असते. मध्यंतरी या मार्गावर अपघात ही घडले असल्याचे दिसून आले. असे असले तरी बांधकाम विभागाने सदर मार्ग दुरुस्तीसाठी कोणतेही प्रयत्न केले नाही. कदाचित बांधकाम विभाग या मार्गावर एखादा मोठा अपघात घडण्याची तर वाट तर पाहत नाही ना? अशी बोलकी प्रतिक्रिया परिसरातील नागरिक व्यक्त करीत आहेत.

दिवाळीनंतर या भागातील गावागावात अनेक मोठ्या जत्रांचे (मंडई) आयोजन होत असते. या मंडई मध्ये हजारोंच्या संख्येने नागरिक सहभागी होतात.अशात रात्री-अपरात्री एखादा मोठा अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे लोकप्रतिनिधींनी व बांधकाम विभागाने दिवाळीपूर्वी हा रस्ता दुरुस्त करावा अशी मागणी परिसरातील नागरिकांनी बांधकाम विभागाकडे केली आहे.

# आदेश धडकले! आता जुन्याच निकषानुसार होणार धान खरेदी



**गोंदिया:** शासकीय धान खरेदी केंद्रावर धान खरेदी करणाऱ्या सेवा सहकारी संस्थांना शासनाने यावर्षी नवीन निकष लावले होते. त्यामुळे संस्थांनी धान खरेदी न करण्याचा निर्णय घेतला. त्यामुळेच जिल्ह्यात अद्यापही धान खरेदी केंद्र सुरू झाले नव्हते. नवीन निकष रद्द करून त्वरित धान खरेदी सुरू करण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पक्षीय लोकप्रतिनिधींनी शासनस्तरावर पाठपुरावा केला. त्याचीच दखल घेत शासनाने जुन्याच निकषानुसार चालू खरीप हंगामात धान खरेदी करण्याचा आदेश गुरुवारी (दि.१) काढला. धान खरेदी त्वरित सुरूकरण्याचे निर्देश जिल्हा मार्केटिंग फेडरेशनला दिले आहेत.

यंदा दिवाळी तोंडावर आली तरी धान खरेदीला सुरुवात झाली नाही. परिणामी, शेतकऱ्यांना खासगी व्यापाऱ्यांना कमी दराने धान विक्री करण्याची वेळ आली होती, तर हमीभावाने धान खरेदी सुरून झाल्याने शेतकरी अडचणीत आले होते. याचीच दखल घेत आ. विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, मनोहर चंद्रिकापुरे, माजी आ. राजेंद्र जैन यांनी अन्न व नागरी पुरवठामंत्री छगन भुजबळ यांची भेट घेऊन ही समस्या मार्गी लावण्याची मागणी केली होती. याचीच दखल घेत ना. भुजबळ यांनी १ नोव्हेबर रोजी मुंबई मंत्रालयात या विषयासंदर्भात बैठक घेतली. या बैठकीला गोंदिया-भंडारा जिल्ह्यांतील सर्व पक्षीय नेते उपस्थित होते.

या बैठकीत धान खरेदी करणाऱ्या संस्थांना लावलेल्या नवीन जाचक अटी रद्द करून जुन्याच निकषानुसार खरेदी करण्यात यावी, संस्थांचे कमिशन व तूट वाढवून देण्यात यावी, गोदाम भाडे व कमिशनची थकीत रक्कम त्वरित देण्यात यावी, धानाची उचल लवकर करण्यात यावी, या विषयांवर चर्चा करण्यात आली. त्यानंतर अन्न व नागरी पुरवठा विभागाने गुरुवारी यासंबंधीचा आदेश काढीत जुन्याच निकषानुसार धान खरेदी करण्याचे निर्देश दिले आहेत, तसेच धान खरेदीला त्वरित सुरुवात करण्याच्या सूचना जिल्हा मार्केटिंग फेडरेशन आणि आदिवासी विकास महामंडळाला दिल्या आहेत. त्यामुळे धान खरेदी करणाऱ्या संस्थांची समस्या मार्गी लागली असून, त्यांनी खा. प्रफुल्ल पटेल, आ. विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, मनोहर चंद्रिकापुरे, माजी आ. राजेंद्र जैन यांचे आभार मानले.

**अटी शिथिल केल्याने सर्वच केंद्रे सुरू होणार**

खरीप हंगामात जिल्हा मार्केटिंग फेडरेशनच्या १४० आणि आदिवासी विकास महामंडळाच्या ४४, अशा एकूण १८४ धान खरेदी केंद्रांवरून हमीभावाने धान खरेदीला सुरुवात होणार आहे. एमईएल पोर्टलवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांना या हमीभाव केंद्रावर धानाची विक्री करता येणार आहे.

**शेतकऱ्यांनी अल्पदराने खासगी व्यापाऱ्यांना धान विकण्याची अडचण येऊ नये व दिवाळीपूर्वी त्यांना हमीभाव केंद्रावर धानाची विक्री करता यावी, धान खरेदी करणाऱ्या संस्थांच्या अडचणी दूर व्हाव्यात, यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा केला. या सर्व समस्या आता दूर झाल्या असून, धान खरेदीला सुरुवात होईल.**

**- प्रफुल्ल पटेल, खासदार**

**शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दराने धान विकण्याची वेळ येऊ नये, खासगी व्यापाऱ्यांकडून त्यांची लुटमार होऊ नये, तसेच धान खरेदी संस्थांच्या अडचणी त्वरित दूर व्हाव्यात यासाठी अन्न व नागरी पुरवठामंत्र्याकडे पाठपुरावा केला. त्याचे फलित झाले असून, आता धान खरेदीचा मार्ग मोकळा झाला आहे.**

**- विनोद अग्रवाल, आमदार**

**शासनाने जुन्याच निकषानुसार संस्थांना धान खरेदी करण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे धान खरेदीतील अडचण दूर झाली आहे. लवकरच धान खरेदीला सुरुवात होऊन शेतकऱ्यांची दिवाळीत आनंदात जाईल.**

**- विजय रहांगडाले, आमदार**

**दिवाळी तोंडावर असताना धान खरेदीला सुरुवात न झाल्याने शेतकरी संकटात आले होते. दरम्यान, शासनाने खरेदीच्या मार्गातील अडचण दूर केल्याने शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.**

**- मनोहर चंद्रिकापुरे, आमदार**

**शासनाने धान खरेदीतील सर्व अडचणी दूर केल्या आहेत. त्यामुळे आदिवासी विकास महामंडळानेसुद्धा धान खरेदीची प्रक्रिया त्वरित सुरू करावी.**

**- सहषराम कोरोटे, आमदार**

# पंतप्रधान मोदी, प्रफुल्ल पटेल यांच्यात विमानतळावर चर्चा





**गोंदिया :** मध्य प्रदेश आणि छत्तीसगड या राज्यांमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची रविवारी शिवणी (मध्य प्रदेश) येथे प्रचार सभा होती. शिवणीला जाण्यासाठी त्यांचे गोंदियामधील बिरसी विमानतळावर सकाळी १० वाजता आगमन झाले.

यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे (अजित पवार गट) कार्यकारी अध्यक्ष खासदार प्रफुल्ल पटेल यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी पंतप्रधान मोदी आणि खासदार पटेल यांच्यात सुमारे वीस मिनिटे चर्चा झाली.

गोंदिया आणि भंडारा जिल्ह्यांतील विकासकामे, बिरसी विमानतळावरुन १ डिसेंबरपासून सुरू होत असलेली प्रवासी विमान वाहतूक, कागी सेवा सुरू झाल्यास कृषी मालाच्या निर्यातीसाठी होणारी मदत, रोजगाराच्या संधी आदी विषयांवर पंतप्रधान मोदी आणि खासदार पटेल यांच्यात चर्चा झाली. राज्यात शिंदे गट आणि अजित पवार गटाच्या आमदार अपात्रतेबाबत सुनावणी सुरू असून या पार्श्वभूमिवरही दोघांमध्ये राजकीय चर्चा झाल्याचे बोलले जात आहे.

बिरसी विमानतळावर पंतप्रधानांचे आगमन होणार असल्याने येथे मोठ्या प्रमाणात पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. मागील चार दिवसांपासून हा परिसर सुरक्षेच्या दृष्टिकोनातून ताब्यात घेण्यात आला होता. तीन दिवसांपासून पोलिसांच्या विविध पथकांची मॉकड्रिल सुरू होती. पंतप्रधान मोदी यांच्या या दौऱ्याविषयी कमालीची गोपनीयता बाळगण्यात आली होती.

# श्रमदानातून बदलतेय गंगाझरीचे चित्र

## सरपंचाच्या मार्गदर्शनात गावकऱ्यांनी उचलला स्वच्छतेचा विडा



**गोरेगाव:** सुंदर गावाची कल्पना, त्याविषयी वाटणारी ओढ असली की शासनाच्या योजना गावागावात पाणी भरतात, असे म्हटले जाते. जेव्हा शासनाच्या योजना गावपतळीवर राबविल्या जातात तेव्हा गावाचे रुपांतर सुंदर गावात कसे होते, याचे उदाहरण म्हणजे गंगाझरी हे छोटेसे गाव होत. दर रविवारी या गावातील तरुण मंडळी श्रमदानातून स्वच्छतेचे धडे देत आहेत. या स्वच्छता अभियानात गावकरी आणि चिमुकली मुले श्रमदान करण्यासाठी पुढे येतात. त्यामुळे राष्ट्रसं तुकडोजी महाराजांनी दिलेल्या मुलमंत्रानुसार हात लगे निर्माण में असे चित्र सध्या गंगाझरी गावात पाहायला मिळत आहे.

आजघडीला गंगाझरी गावाचा चेहरामोहरा बदलला. यासाठी गंगाझरीचे सरपंच सोनू विनायक घरडे यांचे अथक परिश्रम कामी आले. धकाधकीच्या या जगात श्रमदान करण्यासाठी सहजासहजी कुणी धजावत नाही. हल्ली कुणाकडे फारसा वेळ नाही. सगळेच आपापल्या जगण्यात तल्लीन आहेत. अशावेळी श्रमदाण तेपण १०८ आठवड्यांतून निरंतर. ध्येयाच्या नवटेत बसून प्रयत्नाची वल्ली मारली असता यशाचा किनारा दूर नसतो, हा सुविचार प्रत्यक्ष आपल्या जीवनात उतरवून सुरुवातीच्या काळात गंगाझरीचे सरपंच सोनू घरडे यांनी काही लोकांना श्रमदानासाठी सोबत घेतले आणि सुरु झाला एक प्रवास श्रमदानाचा. गाव विकासाचा, गाव स्वच्छतेचा. सुरुवातीला श्रमदानासाठी फारशी लोक एकत्र झाली नाहीत. पण आता श्रमदान करण्यासाठी स्वतःहून लोक येतात. हातात झाडू घेऊन गाव स्वच्छ करतात. जणू आता गंगाझरीवासीयांना गाव स्वच्छ करण्याची सवय झाली असावी. सरपंच सोनू घरडे यांच्या कल्पनेतून, श्रमदानातून गाव स्वच्छ करण्याचा विचार पुढे आला आणि पाहता पाहता स्वच्छ गाव, सुंदर गाव ही वैचारिक क्रांती गंगाझरीत घडली.

**एक रविवार स्वच्छतेसाठी**

रविवारी गंगाझरी येथे सेंटर पॉईंड चौक, ग्रामपंचायत कार्यालय परिसर, अंगणवाडी, जिल्हा परिषद शाळा, प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, हनुमान टोला शाळा, केरझरा तीर्थक्षेत्र आदि ठिकाणी सकाळी ६ ते ९ स्वच्छता अभियान राबविण्यात येत आहे. विशेष म्हणजे अभियानात आता गावकरी सुद्धा स्वयंउत्स्फूर्तपणे सहभागी होत असल्याने गंगाझरी गावाचे रुपडे बदलत अलस्याचे चित्र आहे.

**अभियानात यांचा सहभाग उल्लेखनीय**

स्वच्छता अभियानात सरपंच सोनू विनायक घरडे, ग्रामपंचायत सदस्य महेंद्र धुर्व, वनपरिक्षेत्र अधिकारी रूपेंद्र भांडारकर, वनरक्षक राने, वनमजूर हेतसिंग नागभिरे, हरिलाल बेलवंशी, लजाराम पटले, नूतनसिंह नागभिरे, हेमंत कुंभरे, विशाल उके, भीमराज बोम्बार्डे, धर्मराज बोम्बार्डे, अरविंद मेश्राम, पीयुष भालाधरे, दिव्यांग श्रीधर लुटे व गावकरी युवकांचा समावेश आहे.

# दुपारचे एक रुपयात जेवण मिळालेच नाही;आता योजनाही झाली बंद

## गोंदियातील कामगार राहिले उपाशी: गोंदिया मोठ्या आस्थापनाच नाहीत



**गोंदिया:** महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडे नोंदणीकृत व पात्र ठरलेल्या एकाही कामगाराला दुपारचे मोफत जेवन दिले जात नाही.

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या आस्थापना नसल्यामुळे दुपारचे जेवण मिळत नाही. कामगारांना दुपारचे जेवण कामाच्या ठिकाणी मोफत उपलब्ध करुन दिले जात आहे. कोरोनापुर्वी यासाठी पाच रुपये खर्च करावे लागत होते. मात्र कोरोनाकाळात सरकारने हे पैसे माफ केले आहेत. यामुळे कामगाराला एक रुपया खर्च करुन मध्यान्ह भोजन मिळते. गोंदिया जिल्ह्यात ९८ हजार ६२२ कामगारांची नोंदणी आहे. मात्र बहुतांश जण नोंदणी करण्याकडे, तसेच नुतनीकरण करण्याकडे कानाडोळा करतात. सद्यःस्थितीत जिल्ह्यात ९८ हजार ६२२ बांधकाम कागगारांची नोंद आहे. परंतु सक्रिय ९ हजार ७१४ आहेत. परंतु मोठ्या आस्थापना नसल्यामुळे त्यांना दुपारचे जेवण मिळत नव्हते. आता ही योजना सरकारने १ नोव्हेंबरपासून बंद करण्यात आली आहे.

**काय होती मध्यान्ह भोजन योजना**

डिसेंबर २०२० पासून मध्यान्ह भोजन योजना सुरु केली होती. त्यामध्ये पाच रुपये कामगाराकडून घेऊन जेवण घायचे सुरुवातीला प्रयोजन होते. मात्र कोरोनाकळात शासनाने हे पाच रुपये माफ केले होते. आता १ नोव्हेंबरपासून ही योजना बंद करण्यात आली आहे.

**१ नोव्हेंबरपासून योजना बंद**

कामगारांना दुपारच्या जेवणाची एक रुपयात सोय करुन देणारी मध्यान्ह भोजन योजना १ नोव्हेंबरपासून बंद करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे. जे कामगार इमारती, वीटभट्या आदी साइटवर काम करतात अथवा तिथेच राहतात अशा कामगारांना मोफत जेवण देण्याची योजना होती.

**योजना असणे नसणे एकच**

साइटच्या कंत्राटदाराने मालकाने, मनरेगा कामावरील कामगारांसाठी तहसीलदाराने मागणी करुन दिलेल्या कामगारांच्या यादीची अधिकाऱ्याकडून खातरजमा केली जाते आणि जेवण पुरवले जावा असे नियम असताना गोंदियात जेवण दिले जात नाही. यामुळे ही योजना गोंदिया असणे किंवा नसणे ही बाब एकच आहे.

**एकाही कामगारांना मिळत नव्हता घास**

गोंदिया जिल्ह्यात मोठ्या आस्थापना नसल्यामुळे एकही कामगारांना दुपारचे जेवण मिळत नव्हते. योजना सुरु झाल्यावरही एकाही कामगाराला भोजन न देता तीन वर्षानंतर ही योजना बंद करण्यात आली आहे.

**अपघाती मृत्यू झाल्यास ५ लाख**


नोंदणीकृत बांधकाम कामगारांचा बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू झाला. आणि त्या कामगाराची जीवित नोंदणी सक्रिय असेल तर त्या व्यक्तीच्या नातेवाइकांना ५ लाखांची मदत दिली जाते. बांधकाम करणाऱ्या कामगाराची वय ५० ते ६० वर्षे वयोगटातील असेल तर दोन लाख रुपये नातेवाइकांना मदत देण्यात येते.

**बांधकाम कामगारांची नोंदणी सक्रिय असेल आणि त्याचा बांधकामाच्या ठिकाणी मृत्यू झाला, तर पाच लाख बांधकाम कामगारांना मिळते. कामगारांचे वय ५० ते ६० वर्षे असल्यास घरच्यांना दोन लाखांची मदत, विधूर किंवा विधवा महिलेला ५ वर्षाकरिता २४ हजार, कामगाराचा मृत्यू झाल्यास अंत्यविधीकरिता १० हजार व कामगारांच्या मुलांना शिक्षणासाठी प्रोत्साहन म्हणून विविध लाभ दिला जातो.**


**उज्वल लोया, सहायक आयुक्त कामगार कार्यालय, गोंदिया**

# प्रसुतीसाठी लागणाऱ्या साहित्याची बाहेरून खरेदी

## गंगाबाई रुग्णालयात रुग्णांची लुट: बाहेरुन औषध आणण्याचा सल्ला




**गोंदिया:** जिल्ह्यातील एकमेक स्त्री रुग्णालय असलेल्या बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात रुग्ण आणि त्यांच्या नातलगांची लुट थांबेना अशी गत झाली. पैसे दिल्याशिवाय प्रसुती होत नसल्याची आतापर्यंत ओरड होती. आता मात्र सर्वच औषधी आणि शस्त्रक्रियेसाठी लागणारे साहित्य देखील बाहेरुन आणण्यासाठी सांगितले जात आहे.सिझेरिअन करण्यासाठी सुई, हातमोजे, इंजेक्शन, धागा, ब्लेड आणि बेटाडिन औषध सर्वच बाहेरुन आणण्यात सांगण्यात येत आहे. कोट्यावधी रुपयांचा औषधसाठा येत असताना बाहेरुन खरेदी करण्याचा सल्ला का दिला जातो हे कळायला मार्ग नाही.



गोंदिया जिल्ह्यासह भंडारा, गडचिरोली तसेच मध्यप्रदेश आणि छत्तीसगड राज्यातील नजीकच्या जिल्ह्यातून बाई गंगाबाई स्त्री रुग्णालयात महिला प्रसुतीसाठी येतात. जिल्ह्यातील हे एकमेव महिला रुग्णालय आहे. त्यामुळे येथे नेहमीच रुग्णांची गर्दी असते. हे रुग्णालय शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाकडे देण्यात आले. वैद्यकीय महाविद्यालयाकडे गेल्यामुळे या रुग्णालजातील सेवा अधिक चांगली होऊन त्याचा लाभ येथे उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना होऊन लुटमार थांबेल, असा समज होता. मात्र तो गैरसमज ठरला. या रूग्णालयात हलगर्जीपणाने कळस गाठला. माता आणि बालमृत्युचे प्रमाण कमी होत नाही. रुग्णालयात महिला रुग्णांसोबत होणारी हेळसांड हा नवीन प्रकार नाही. येथे दलालराज मोठ्या प्रमाणात वाढले आहे. पैसे दिल्याशिवाय काम होत नाही. आधीच जिल्ह्यात रोजगाराची वाणवा असल्याने महिला येथे उपचारासाठी येतात. अशातही त्यांची आर्थिक लुट होत असल्याचा आरोप रुग्णांचे नातलग करत आहेत. पैसे दिल्याशिवाय रिझेरियन प्रसुती होत नाही. गेल्या काही महिन्यांपासून रुग्णालयात औषध नसल्याचे सांगून बाहेरुन औषध खरेदीसाठी चिठ्ठी लिहून दिली जाते. शस्त्रक्रियेसाठी लागणारी सुई, धागा, ब्लेड, बेटाडिन, हातमोजे, इंजेक्शन असे सर्वच साहित्य खरेदी करण्याचा सल्ला दिला जातो. यात मोठ्या प्रमाणात रुग्णांची लुट होत आहे. हा प्रकार खुलेआम सुरु असताना कुणाच्याच लक्षात कसे येत नाही, असा आरोप यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

### रुग्णालयात येणारा औषधसाघा जातो कुठे?

**वॉर्डातील परिचारिका प्रसुतीपूर्व आणि प्रसुती पश्चात रुग्णांच्या नातलगांना औषधे आणण्यासाठी चिठ्ठी लिहून देतात. वॉर्डाच्या बाहेर दारालगत एक व्यक्ती उभा असतो. तो चिठ्ठी घेऊन लगेच तिथेच औषधे उपलब्ध करुन देतो. ती औषधे रुग्णालयात कशी विक्री केली जातात हा संशोधनाचा विषय आहे. बाहेरील औषध दुकानातून खरेदी करुन आणलेली औषधे परत करण्यात येतात. दलालांकडूनच खरेदी रण्याचा अट्टाहास केला जातो हे विशेष.**

### रुग्णालांची लुट बंद करा

**रुग्णालयाला कोट्यावधी रुपयांचा औषधसाठा देण्यात येतो. असे असतानाही नेहमीच येथे औषधांचा तुटवडा असल्याचे कारण पुढे करुन बाहेरुन औषध खरेदीचा सल्ला दिला जातो. केटीएस रुग्णालयात देखील हाच प्रकार आहे. शासकीय रुग्णालयाच्या नावावर लुटमार बंद करावी, अशी मागणी केली जात आहे.**

# "भटक्या जमातीच्या लोकांना मिळणार हक्काचे पक्के घर"

**गोंदिया:** विमुक्त जाती, भटक्या जमाती या प्रवर्गातील कुटूंबाचे राहणीमान उंचावणे, त्यांच्या उत्पन्नाचे स्त्रोत वाढवून त्यांना स्थिरता प्राप्त व्हावी या उद्देशाने इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत विमुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी "यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजना राबविण्यात येते. जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांनी गोंदिया जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती घटकातील ३४३ पात्र लाभार्थी कुटूंबाच्या घरकुलांना मंजूरी व प्रशासकीय मान्यता प्रदान केली.

सदर योजनेअंतर्गत ग्रामीण भागात किमान १० कुटूंबासाठी सामुहिक वसाहत योजना राबवून अथवा रमाई आवास योजनेच्या धतीवर वैयक्तिक स्वरुपात लाभ देण्यात येतो. सदर योजनेअंतर्गत २६९ चौ. फुटाचे पक्के घराचे बांधकामाकरीता लाभार्थ्यांना १ लक्ष २० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. मुक्त जाती भटक्या जमाती या घटकासाठी यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत योजनेच्या जिल्हास्तरीय समितीची सभा जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली १७ ऑक्टोबर २०२३ रोजी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सभेत गोंदिया जिल्ह्यातील विमुक्त जाती भटक्या जमाती घटकातील ३४३ पात्र लाभाथी कुटूंबाच्या घरकुलांना मंजूरी व प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. सदर मंजूरी जिल्हाधिकारी चिन्मय गोतमारे यांचे अध्यक्षतेखाली व मुख्य कार्यकारी अधिकारी अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली देण्यात आली.

यावेळी सामाजिक न्याय विभागाचे सहायक आयुक्त विनोद मोहतुरे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रतिनिधी वैशाली खोब्रागडे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.कांतीलाल पटले, महाव्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्राचे प्रतिनिधी कुणाल गोंडचवर, जिल्हा व्यवस्थापक वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळाचे प्रतिनिधी एस.वाय.माटे, अशासकीय सदस्य अदासी येथील संतोष किसननाथ तांबू व जिल्ह्यातील सर्व पंचायत समित्यांचे गटविकास अधिकारी यांची उपस्थिती होती.

# ३९ कोल्हापुरी बंधारे भग्नावस्थेत

## कित्येक ठिकाणच्या पत्र्यांची चोरी: पाणी जाते वाहून, दुरुस्तीकडे प्रशासनाचे दुर्लक्ष



**गोंदिया:** दुष्काळी स्थितीत बंधाऱ्यांच्या मदतीने शेतीला सिंचनाची सोय करता यावी, यासाठी जिल्ह्यात ठिकठिकाणी लाखो रुपये खर्चून कोल्हापुरी बंधारे तयार करण्यात आले. मात्र, बंधारे तयार केल्यानंतर त्यांच्या देखभाल दुरुस्तीकडे प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने हे कोल्हापुरी बंधारे केवळ शोभेची वस्तू ठरत आहेत. जिल्ह्यातील २०० कोल्हापुरी बंधारे भग्नावस्थेत आहेत.

जिल्ह्यात जिल्हा परिषदेच्या लघू पाटबंधारे विभागांतर्गत २९४ कोल्हापुरी बंधारे आहेत. या बंधाऱ्यामुळे १० हजार ७४ हेक्टर क्षेत्राचे सिंचन होऊ शकते. मात्र ३९ बंधारे नादुरुस्त असल्यामुळे हजारो हेक्टर शेती सिंचीत होऊ शकत नाही. पाटबंधारे विभागांतर्गत २०० कोल्हापुरी बंधारे आहेत. जिल्ह्यातील २०० कोल्हापुरी बंधारे हे भग्नावस्थेत आहेत. शिवकालीन काळातील माती अडवा, पाणी जिरवा हा मुलमंत्र पुढे जोपासत कोल्हापुरी बंधारे बांधण्यात आले. या बंधाऱ्यामुळे हजारो हेक्टरला सिंचनाची सोय होऊ शकते. मात्र बंधाऱ्याच्या देखभाल दुरुस्तीकडे जिल्हा प्रशासन आणि संबंधित विभागाचे दुर्लक्ष झाल्याने त्यांची अवस्था बिकट झाली आहे. बंधाऱ्यांना मोठमोठे भगदाड पडले आहेत. त्यामुळे यामध्ये पाणी साठून राहण्याऐवजी ते वाहून जात आहे. परिणामी, शेतकऱ्यांना सिंचनापासून वंचित राहावे लागत आहे. सिंचन विभाग या जुन्या कोल्हापुरी बंधाऱ्याची डागडुजी करण्याऐवजी नवीन बंधारे तयार करणयावर भर देत आहेत. कोल्हापुरी बंधाऱ्यांची योग्य देखभाल दुरुस्ती न केल्याने त्यांची हालत खस्ता झाली आहे.

### वन विभागाचे बंधारे सुसाट

**जंग़लातील नाले आणि रपट्यावरुन पाणी वाहून जाऊ नये, ते अडून जमिनीत पाण्याचा निचरा व्हावा, तसेच साचलेल्या पाण्याचा वन्यजीवांसाठी वापर व्हावा, याकरिता दरवर्षी वनविभागातर्फे बंधाऱ्याचे बांधकाम करण्यात येते. मात्र वन विभागाचे बंधारे केवळ फार्स ठरत आहेत. तेथीलच गिट्टी आणि तिथलीच वाळू वापरुन अत्यंत निकृष्ठ दर्जाचे बांधकाम करण्यात येते. या बंधारे बांधकामातून मात्र कंत्राटदार मालामाल होत असून शासनाचे उद्दिष सपसेल अपयशी ठरत आहे. या बंधाऱ्यांची नि:पक्ष चौकशी झाल्यास मोठे घबाड समोर येणार आहेत. मात्र त्याकडे वनविभाग अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष आहे. तर इतर विभागाला सोयरसुतक नसल्याने बांधकामे सुसाट सुरु आहेत.**

### बंधाऱ्याच्या लोखंडी प्लेट चोरी

**बाघ नदीवरील कोल्हापुरी बंधाऱ्यांच्या प्लेट चोरीला गेल्याने नदीचे पाणी अडून न राहता वाहून जाते. अनेक बंधाऱ्यांच्या प्लेट चोरीला गेल्याने या बंधाऱ्यांमध्ये एकही वर्षी पाणी साठून राहत नाही. विशेष म्हणजे, ग्रामीण भागातील कोल्हापुरी बंधाऱ्यांना पुराचा तडाखा बसल्याने या बंधाऱ्यांच्य दोन्ही बाजूला खिड पडली आहे. त्यामु बंधाऱ्यातील पाणी वाहून जाते. त्यामुळे लाखो रुपये खर्च रुन तयार करण्यात आलेले हे दोन्ही बंधारे केवळ नावापुरतेच ठरत आहे. बाघ नदीवर तयार करण्यात आलेल्या कोल्हापुरी बंधाऱ्याच्या लाखो रुपये किमतीच्या लोखंडी प्लेट चोरीला गेल्या आहेत.**

# गोंदिया-वडसा-चंद्रपुर लोकल पूर्ववत सुरु करा

## अन्यथा आंदोलन छेडणार-अशोक लंजे यांचा इशारा



**गोंदिया:** गोंदिया-बल्लारशा मार्गावरील गोंदिया रेल्वे स्थानकावरुन सायंकाळी ७ वाजता सुटणारी ०८८०६ ही लोकल गाडी ३१ ऑक्टोबर पासून बंद करण्यात आली आहे. परिणामी या मार्गावरील प्रवाशांना फटका बसत ही गाडी पूर्ववत सुरु करण्यात यावी. अन्यथा या विरोधात आंदोलन छेडण्याचा इशारा माजी जि.प.सभापती अशोक लंजे यांनी दिला आहे.

गोंदिया-बल्लारशा हे अंतर जवळपास ३०० किमीचे असून या मार्गावरील लोकल रेल्वे गाड्यांमुळे प्रवाशांना सोयीचे होते. बसच्या तुलनेत लोकल रेल्वे गाड्यांचे तिकीट सुद्धा कमी असल्याने सर्वसामान्यांना या रेल्वे गाड्यांचा प्रवासासाठी मोठा आधार होतो. कोरोनाचा प्रादुर्भाव पूर्णपणे कमी झाल्यानंतर रेल्वे विभागाने या मार्गावरील सर्व पॅसेंजर, लोकल आणि एक्सप्रेस गाड्या पूर्ववत केल्या होत्या. त्यामुळे प्रवाशांची सोय झाली होती. मात्र दक्षिण पूर्व मध्य रेल्वे विभागाने अचानक ३१ ऑक्टोबरपासून गोंदिया रेल्वे स्थानकावरुन सायंकळी ७ वाजता सुटणारी वडसा पर्यंत जाणारी गाडी बंद केली. विशेष म्हणजे हीच गाडी दुसऱ्या दिवशी सकाळी ७ ाजता वडसा रेल्वे स्थानकावरुन चंद्रपुर व बल्लारशाला जात होती व दुपारी ३ वाजता गोंदियाला परत येत होती. त्यामुळे चंद्रपूरहून गोंदियाकडे येणाऱ्या आणि गोंदियाहून वडसेकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी ही गाडी सोय होती. परंतु कुठलेही कारण नसताना रेल्वे विभागाने ऐन सणासुदीच्या काळात ही गाडी बंद केल्याने प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रेल्वे विभागाने ही गाडी पूर्ववत सुरु करावी अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशारा अशोक लंजे यांनी दिला आहे.

**रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक सुधारा**

**गोंदिया-बल्लारशा मार्गावरील रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक पूर्णपणे बिघडले आहे. त्यामुळे प्रवाशांना त्यांच्या नियोजित ठिकाणी पोहचण्यास अडचण होत आहे. त्यामुळे ही अडचण लक्षात घेत या मार्गावरील रेल्वे गाड्यांचे वेळापत्रक सुधारुन प्रवाशांची अडचण दुर करण्याची मागणी केली जात आहे.**